# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २५ मार्च, २०१५ / चैत्र ४, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९८**

---

**कारखाना कायदा १९४८, मध्ये ५४ दुरूस्त्या करण्यात आल्यामुळे कामगारांवर होणा-या दुष्परिणामाबाबत**

**(१) * २८४५ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारखाना कायदा १९४८, मध्ये ५४ दुरूस्त्या करण्यात आल्यामुळे विजेचा वापर करणाऱ्या कारखान्यात २० कामगार आणि विजेचा वापर न करणाऱ्या कारखान्यात ४० कामगार असतील तर हा कायदा लागू होईल, यामुळे जास्तीत जास्त कामगार स्वच्छता, सुरक्षा, पिण्याचे पाणी, कामाचे तास, साप्ताहिक सुट्टी, ओव्हर टाईम, बाळंतपणाची रजा इ. सुविधांपासून वंचित राहणार असल्याचे तसेच वार्षिक भरपगारी रजा साठविण्याची मर्यादा २९० दिवसांवरून ३० दिवस करण्यात आल्याने यासारखे अनेक दुष्परिणाम होत असल्याबाबतचे सविस्तर निवेदन भारतीय कामगार सेना (पुणे विभाग), पुणे यांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.कामगार मंत्री यांना दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने या दुरूस्त्यांसंदर्भात कोणते निर्णय घेतले आहेत,

(३) अद्याप, या संदर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) कारखाने अधिनियम, १९४८ या केंद्र शासनाच्या अधिनियमातील काही कलमांमध्ये बदल करण्यासाठी, संविधानातील तरतुदी विचारात घेऊन, त्याबाबतचा प्रस्ताव मा.राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन होता. तथापि, प्रस्तुत अधिनियमामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असून त्या संदर्भातील विधेयक अलीकडेच संसदेत सादर करण्यात आलेले आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीत, सदर अधिनियमातील कलमांमध्ये बदल प्रस्तावित करण्यासंबंधीचा राज्य शासनाचा प्रस्ताव सद्य:स्थितीत तूर्त स्थगित ठेवण्याचा विषय विचाराधीन आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने उक्त कायद्यात बदल करण्यात येऊ नयेत अशा आशयाची निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

-----------------

**राज्यातील पोलिसांसाठी नवीन घरबांधणी व जुन्या वसाहतींची दुरुस्ती करणेबाबत**

**(२) * ३७८२ श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीसांसाठी गेल्या २० वर्षात फक्त २० हजार घरे बांधली गेल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पोलीसांच्या गृहप्रकल्पांसाठी प्रत्येक वर्षी ४०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जात होते परंतू मागील दोन वर्षात सदर मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही तसेच प्रशासकीय मंजूरीही न मिळाल्याने पोलीस गृहनिर्माणाचे काम ठप्प झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे ही आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन का देण्यात आला नाही व प्रशासकीय मंजूरीला विलंब का होत आहे,

(४) तसेच, मुंबईमध्ये पोलीसांसाठी असलेल्या वसाहती पुर्णपणे जीर्ण झालेल्या असून अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सध्या पोलीस राहत असलेल्या जीर्ण झालेल्या वसाहतींच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. मागील २० वर्षात एकूण १९,०५१ इतकी निवासस्थाने बांधली आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

पोलिसांच्या निवासस्थाने व कार्यालयीन इमारतींसाठी मागील तीन वर्षात खालीलप्रमाणे निधी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे :-

| वर्ष | महामंडळाला उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी रुपये (कोटीत) |
|---|---|
| २०१२-१३ | २३४.७८ |
| २०१३-१४ | १६५.६५ |
| २०१४-१५ | १३४.६१ |
| एकूण | ५३५.०४ |

बांधकाम सुरु असलेल्या तसेच मंजूर झालेल्या कामांचे आर्थिक दायित्व अधिक असल्याने नव्याने प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या नाहीत.

(४) व (५) मुंबईतील बऱ्याचश्या पोलीस वसाहती व निवासस्थाने ब्रिटीशकालीन असल्याने मोडकळीस आलेल्या असून ज्या वसाहतींची दुरुस्ती शक्य आहे त्यांची दुरुस्ती करण्याची व ज्या वसाहती दुरुस्ती करण्यायोग्य नाहीत, त्यांचा पुनर्विकास करण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजकीय कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींवरील सन २००५ पर्यंतचे**
**राजकीय खटले काढून टाकण्याबाबत**

**(३) * २९०९ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजकीय कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींवरील सन २००५ पर्यंतचे राजकीय गुन्हे काढून टाकण्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजारो कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींवर त्यानंतरच्या कालावधीतही अनेक खटले दाखल झाले असून दिवसेंदिवस ह्या संख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खटले प्रलंबित असल्यामुळे लोकप्रतिनिधींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रलंबित खटले तातडीने काढून टाकण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासनाने दि. ०७/०७/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये राजकीय व सामाजिक आंदोलनातील दि. ०१/०५/२००५ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले खटले मागे घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केली होती. त्यानंतर दि. १३/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजकीय व सामाजिक आंदोलनामध्ये दि. ०१/११/२०१४ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले आणि ज्या घटनेत जिवित हानी झालेली नाही आणि खाजगी सार्वजनिक मालमत्तेची रु. ५ लक्ष पेक्षा जास्त रकमेची हानी झालेली नाही असे खटले मागे घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर शासन निर्णयानुसार अशा प्रकरणी खटले मागे घेण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी पोलीस आयुक्ताल कार्यक्षेत्रासाठी, पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, आभियोग संचालनालय व पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे. तसेच उर्वरित भागासाठी जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक संचालक, अभियोग संचालनालय व अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरामध्ये नदी सुधार योजनेंतर्गत सुयश ट्रिटमेंट प्लान्टबाबत

**(४) * ३२०३ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये नदी सुधार योजनेंतर्गत सुयश ट्रिटमेंट प्लान्टसाठी अंदाजे ८०० कोटी रुपयांची योजना राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यात आली असून नॅशनल रिव्हर डेव्हलमेंट कॉर्पोरेशनने जपानच्या झायका कंपनीसोबत अत्यल्प व्याजदराने कर्ज मिळविण्यासाठी चर्चा सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प मंजूर होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार आहे काय,

(३) असल्यास, ही योजना कधी पर्यंत मंजूर होईल तसेच याबाबत राज्य शासन व पुणे महानगरपालिकेने काही कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय,

(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरातील संपूर्ण मैला पाण्यावर प्रक्रिया करुन ते नदीत सोडण्यासाठी रुपये ७१५.०५ कोटीची योजना तयार करण्यात आली. सदर योजना पर्यावरण विभागाच्या शिफारशीसह दिनांक २१.५.२०१२ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मान्यतेसाठी सादर केलेली आहे.

सदरच्या योजनेकरीता केंद्र शासनाचे EFC (Expenditure & Finance Committee) ची मंजुरी अंतिम टप्प्यात असून, या योजनेअंतर्गत मान्य प्रकल्पीय रक्कमेच्या ८५ % टक्के रक्कम जपान सरकारच्या जायका या संस्थेकडून केंद्र शासनास अल्पशा दराने कर्ज स्वरुपात उपलब्ध होणार आहे. सदरची संपूर्ण रक्कम केंद्र शासनाकडून पुणे महानगरपालिकेला अनुदान स्वरुपात मिळणार आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पास जायका या संस्थेतर्फे फॅक्ट फायडींग मिशन अंतर्गत दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ ते दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत भेट देण्यात आली. त्यावेळी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे बरोबर जायका संस्थेच्या प्रतिनिधीसोबत समक्ष भेट व चर्चा झाली.

(२) होय. प्रकल्प मंजूर होण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरु आहे.
(३) सदरच्या योजनेकरिता केंद्र शासनाचे EFC (Expenditure & Finance Committee) ची मंजुरी अंतिम टप्प्यात असून, माहे मार्च २०१५ अखेर भारत सरकार व जपान सरकार यांचे दरम्यान करारावर स्वाक्षरी होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आरे कॉलनी (गोरेगांव, मुंबई) येथे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यासाठी मोठ्या प्रमाणात करावी लागणारी वृक्षतोड**

**(५) * ३८११ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यासाठी कुलाबा ते सीप्झ या भुयारी मेट्रोचा कारडेपो आरे कॉलनी (गोरेगांव, मुंबई) येथे उभारण्याची बाब मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावाकरिता ३२९२ झाडे तोडावी लागणार असल्याचे मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील एकूणच झाडांची संख्या कमी होत असतांना आरे कॉलनीसारख्या हिरव्यागार पट्टयाचा विनाश होऊ नये म्हणून स्थानिक नागरिकांनी तसेच “वनशक्ती” संस्थेने झाडे तोडण्यास विरोध करून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर झाडाचे जतन व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदरहू ठिकाणी कार डेपोच्या प्रस्तावित विकासातंर्गत २२९८ झाडे बाधित होत असून केवळ २५४ झाडे तोडणे व उर्वरीत २०४४ झाडांचे पुर्नरोपण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर झाडांचे जतन व्हावे यासाठी एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीने सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करुन त्यांचा शिफारस अहवाल शासनास सादर करण्याचे अपेक्षित आहे.

-----------------

**पुणे शहराच्या प्रस्तावित रिंगरोडचे काम अतिशय धीम्या गतीने सुरू असल्याबाबत**

**(६) * ३२९२ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या प्रस्तावित रिंगरोडचे काम अतिशय धीम्या गतीने सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील उच्च क्षमता द्रुतगती प्रकल्पा अंतर्गत वर्तुळाकर मार्गाच्या (एच.सी.एम.टी.आर.) आखणीची सुमारे ३२ किलोमीटर मार्गाची प्रक्रिया पूर्ण झाली असून या रस्त्यासाठी लागणाऱ्या सुमारे ७६ हेक्टर जागेपैकी केवळ ३० टक्के जागा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत, या प्रकल्पासाठी संरक्षण व कारागृह विभागाने जागा देण्यास नकार दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिंगरोडचे काम जलद गतीने सुरू करण्यासाठी भूमी संपादन करून प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहराच्या उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू असून, पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेवर टप्याटप्याने रस्ता विकसित करण्याचे काम सुरू आहे.

(२) उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) या प्रकल्पासाठीच्या सुमारे ३३.८० किलोमीटर मार्गाची आखणीची प्रक्रिया पूर्ण झालेली असून, या रस्त्यासाठी लागणा-या सुमारे ६८.०३ हेक्टर जागेपैकी २१ टक्के जागा सध्या महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

या प्रकल्पासाठी संरक्षण व कारागृह विभागाने जागा देण्यास नकार दिल्याने, सदर भागातील रस्त्याचे अलाईनमेंट बदलण्यासाठीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या नियोजन समितीकडे दाखल केलेला आहे.

(३) उच्च क्षमता द्रुतगती मार्गासाठीच्या एकूण ६८.०३ हेक्टर क्षेत्रापैकी १४.०७ हेक्टर क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असून, त्यावर रस्ता विकसित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

२८.४७ हेक्टर जागा शासनाच्या विविध विभागाशी संबंधीत असून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागांकडे पाठविण्यात आलेले आहेत. सदर क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरू आहे.

तसेच २५.४९ हेक्टर जागा खाजगी असून त्यापैकी १५.८१ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचे कडे सादर केले असून त्यांच्या कार्यालयामार्फत सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही सुरू आहे. सदर खाजगी क्षेत्रापैकी ९.६८ हेक्टर क्षेत्राचे टप्याटप्याने भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू आहे.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**भगवानगडावर (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील दर्शनासाठी आलेले महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांच्या वाहनांच्या ताफ्यावर झालेली दगडफेक**

**(७) * ३४०७ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भगवानगडावर (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथे दर्शनासाठी आलेले महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांच्या वाहनांच्या ताफ्यावर काही जणांनी दगडफेक करुन हल्ला केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दगडफेक करुन हल्ला करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांचे वाहन ताफ्यावर काही अज्ञात इसमांनी दगडफेक केली होती.

(२) व (३) होय, तपासात दगडफेक करणाऱ्या अज्ञात इसमांवर पाथर्डी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ३/२०१५ भादंवि कलम ३३६, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ते निष्पन्न करण्यासाठी तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलस्वामिनी श्री.तुळजाभवानी मंदिरात ठेकेदार व पुजारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(८) * ४०१३ श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.अनिल परब, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे आराध्य दैवत कुलस्वामिनी श्री.तुळजाभवानी मंदिरात सन १९८९ ते २००९ या २० वर्षाच्या कालावधीत ४८० किलो चांदी, १२० किलो सोने व २४० कोटी रुपये रकमेचा अपहार ठेकेदार व पुजारी यांनी मंदिर प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने केल्याचे विशेष लेखा परिक्षकांच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) श्रीतुळजाभवानी मंदिरात सन १९८९ ते २००९ या कालावधीतील सिंहासन दानपेटीतील सोने चांदी व्यवहाराचे विशेष लेखापरिक्षण लेखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या पथकाकडून करण्यात येत असून लेखापरिक्षणाचा अंतिम अहवाल अद्यायाप प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्‍भवत नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**माणकोली (जि.ठाणे) येथील उड्डाणपुलाच्या कामाबाबत**

**(९) * ३५२९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मौजे मोठा गाव डोंबिवली पश्चिम ते माणकोली खाडीवरील माणकोली उड्डाण पुलाच्या बांधकामासाठी सन १९९०-९१ मध्ये सर्वेक्षण व त्यानंतर फेरसर्वेक्षण करण्यात येऊन गतवर्षी म्हणजे २०१४ साली सदर उड्डाण पुलाचे कामास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाण पुलाचे काम मुंबईच्या वरळी सागर उड्डाण पुलाचे धर्तीवर करण्याचे ठरविण्यात येऊन या उड्डाण पुलाचा आराखडा व त्यासाठी रक्कम रूपये २०० कोटींचा निधी गतवर्षीच शासनाने मंजूर केला असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर माणकोली उड्डाणपुलाच्या कामाच्या निविदा दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी काढण्याच्या नियोजनानुसार सदर कामाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत काय व किती रक्कमेच्या काढण्यात आल्या आहेत,

(४) त्याचप्रमाणे याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे. माणकोली-मोटागांव रस्त्यावर मोटागांव येथे उल्हासखाडीवर ६ पदरी पुल व रस्त्याचे बांधकाम करणे यासाठी रु.२४५ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम कंत्राटदाराच्या स्वतःच्या डिझाईनवर करण्याचे प्रयोजित आहे.

(३) व (४) या कामाच्या निविदा मागविण्यासाठी वर्तमान पत्रात तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (Website) प्रदर्शित करण्यात आल्या असून सदरील पूलाच्या कामाची निविदा रक्कम रु.१९० कोटी इतकी असून निविदा रक्कम रु.१९० कोटी इतकी असून निविदा प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

-----------------

**नागपूर येथे बांग्लादेशी घुसखोरांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली वाढ**

**(१०) * ३०३९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे बांग्लादेशी घुसखोरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पोलिसांची विशेष शाखा, गुप्तचर यंत्रणा आणि दहशतवादविरोध पथकाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घुसखोरांना प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मोकळे भुखंड गिरणी कामगारांच्या घरांसाठी म्हाडाला देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(११) * ४१३२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत म्हाडाला सन २००६ पासून सन २०१४ पर्यंत सहा गिरण्यांअंतर्गत गिरणी कामगारांच्या घरांसाठी ३८७३ चौ.मी. इतका भूखंड मिळाला असून या भूखंडाचे क्षेत्रफळ खूप कमी असल्याने तिथे घरे बांधणे शक्य होणार नसल्याने म्हाडाने मुंबई महापालिकेच्या मोकळया भूखंडाची अदलाबदल करुन देण्याच्या मागणीचा प्रस्ताव उक्त पालिकेकडे पाठविला असतानाही यावर अद्यापपर्यंत कोणताही निर्णय घेण्यात न आल्याने ४२९ घरांचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) मुंबईतील बंद कापड गिरण्यांचा पुनर्विकास करताना म्हाडास गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळालेले भूखंड लहान असल्याने त्यावर बांधकाम करणे शक्य होत नाही. सबब म्हाडास गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळालेले भूखंड आणि महानगरपालिकेस मनोरंजन/खेळाचे मैदान वा तत्सम मोकळया वापरांसाठी मिळालेले भूखंड यांची अदलाबदल करणे शक्य व्हावे म्हणून शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ५८ (१) (बी) च्या टिप क्र. ५ मध्ये फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) खाली दिनांक २९.७.२००८ रोजी निदेश दिलेले होते. त्यास अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेने वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केलेला होता. शासनाने सदर प्रस्तावास कलम ३७ (२) खाली मंजूरी दिलेली असून यासंदर्भातील मंजूर फेरबदलाबाबतची अधिसूचना निर्गमित करणेत आली आहे.

-----------------

**सांताक्रुझ (पुर्व) विवेकानंद नगर (मुंबई) येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा विकासक बदलून प्रकल्प पुर्ण करण्याबाबत**

**(१२) * ३४७० श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ पुर्व विवेकानंद नगर (मुंबई) येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टीधारकांच्या संस्थेने नेमणूक केलेल्या मे.जेमीनी डेव्हलपर्स यांनी सदर प्रकल्प दुसऱ्या विकासकाला विकल्यामुळे विकासकाला बदलण्यासाठी संस्थेने सादर केलेल्या ठरावावर निर्णय न घेता विकासकाला पाठीशी घातले जात असल्याबाबत सदर संस्थेने व लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर योजनेसाठी नेमलेला विकासक गेल्या १२ वर्षापासून हे काम करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विकासकाला काढून टाकण्याबाबत संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये दिनांक २० जून, २०१४ रोजी ठराव संमत करुन संस्थेने दिनांक २ जुलै, २०१४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला १ ते १८ मुद्यांचे निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी विकासकाला बदलून सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) सदरहू विषयाबाबतचे मा. लोकप्रतिनिधी यांचे माहे जून, २०१४ मधील निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, त्यांची दिनांक १४.३.२०१४ व दिनांक ९.८.२०१४ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत. तसेच स्वामी विवेकानंद एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेचे प्राप्त झालेले निवेदन उचित कार्यवाहीसाठी दिनांक ३.७.२०१४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विकासकाने सदर योजना दुस-या विकासकास विकली आहे किंवा कसे याबाबत अर्जदार संस्थेने तक्रार अर्जात नमूद केलेल्या बँकेला पत्र पाठवून त्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत खात्री करण्यात येत आहे.

या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे कडे दिनांक २६.२.२०१५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अर्जदार संस्थेतील पात्र झोपडीधारकांच्या संमतीबाबत गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्याची कार्यवाही दिनांक १५.३.२०१५ पर्यंत सहकार विभागाने पूर्ण करावी असे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणी मतदान घेण्यासाठी सहकार विभागाने दिनांक ५.४.२०१५ पर्यंत मुदतवाढ मागितलेली असून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

-----------------

**पुणे येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याबाबत**

**(१३) * ३६९७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुणे येथे स्थापन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबींवर शासनाचा निर्णय झाला आहे काय,

(३) तसेच, नवीन खंडपीठासाठी विविध भागातून होणा-या मागणीस अनुसरून अहवाल सादर करण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायाधीश यांनी तीन न्यायाधीशांची समिती गठीत करून त्यांच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ च्या पत्रान्वये सदरील खंडपीठ राज्यात फक्त कोल्हापूर येथे स्थापन करणे संयुक्तिक ठरेल याबाबत मा.उच्च न्यायालयास कळवावे असे सुचविले आहे, त्यानुसार शासनाने उच्च न्यायालयास याबाबतचा अहवाल पाठविला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ राज्यात कोठे स्थापन व्हावे याबाबत शासनाचा निर्णय झालेला नाही.

(२) नाही.

(३) मा.मुख्य न्यायमूर्तींनी त्यांच्या दि.११/०८/२०१४ च्या मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांना अग्रेषित केलेल्या पत्रास अनुसरुन शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सन २०१२ पासून माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) कायदा लागू केल्याने लिपिक सेवक मोठ्या प्रमाणात बेरोजगार झाल्याबाबत**

**(१४) * ३५६३ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ पासून माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) कायदा आहे त्या स्वरुपात स्विकारल्याने सुमारे २५ हजार किंवा त्यापेक्षा अधिक लिपिक,सेवक बेरोजगार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिपिक, सेवक बेरोजगार होऊ नये याकरिता माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी सध्या अस्तित्वात असलेले धोरण रद्द करुन नवे आयटी धोरण राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० हा केंद्र शासनाचा आहे. सदरची बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ताडदेव येथील भूखंड क्र.४१,४२ व २८४ या भूखंडाचा विकास करताना झालेला गैरव्यवहार

**(१५) * २६७३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल सोले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिका शहरातील मोक्याचे भूखंड विकसीत करीत असल्याने केवळ १५% जमिन यापुढे पालिकेकडे शिल्लक राहणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडदेव येथील भूखंडही विकसित केला जात असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ताडदेव येथील भूखंड क्र.४१,४२ व २८४ या भूखंडाच्या विकासासंदर्भात विकास आराखडा नियंत्रण नियमावली ३३(७) चे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) सदर भूखंड विकसित करण्याची मे.विशारद कन्सल्टंन्ट कंबाईन या विकासकाची मागणी पालिकेने तात्काळ मान्य करून तात्काळ मंजूरी दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विकासकास तात्काळ मंजूरी देताना विकास नियमावलीचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (७) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियिम ३३(७) मध्ये उपकरप्राप्त भाडेकरुव्याप्त असलेल्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भाडेकरुव्याप्त असलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाची बाब अंतर्भूत आहे. वरील इमारती असलेले भूखंड जर आरक्षणाखाली असतील तर विकास योजनेची अंमलबजावणी साधण्याकरिता समावेशक आरक्षणांप्रमाणे तरतुदी विनियम ३३(७) च्या परिशिष्ट III च्या खंड ७ मध्ये आहेत.

त्यानुसार बांधकामयोग्य आरक्षणाचे संदर्भात भूखंडाच्या २५% किंवा आरक्षित क्षेत्राच्या १५% यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणात बांधकाम करुन सुविधा क्षेत्र बृहन्मुंबई महानगरपालिका किंवा समुचित प्राधिकरणास विनामूल्य हस्तांतरीत करणेची तरतूद आहे.

प्रश्नाधीन ताडदेव येथील भूखंड क्र.४१, ४२ व २८४ हे महानगरपालिकेच्या 'किरकोळ मंडई' करिता आरक्षित आहेत. भूखंड क्र.४२ चा पुनर्विकास झालेला असून २५१८.६१ चौ.मी. क्षेत्राचे किरकोळ मंडईचे बांधकाम महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले आहे. भूखंड क्र.४१ मधील पुनर्विकासाच्या प्रस्तावास महानगरपालिकेने तत्वतः मान्यता दिलेली आहे. पुढील कार्यवाही होणेची आहे. भूखंड क्र.२८४ संदर्भात पुनर्विकासाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही. सबब, सदर भूखंडाच्या भूसंपादनाबाबत कार्यवाही महानगरपालिकेकडून करणेत येणार आहे. सदर प्रकरणी विनियम ३३(७) च्या तरतूदीचे उल्लंघन करण्यात आलेले आहे असे निदर्शनास येत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथे राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारणीबाबत**

**(१६) * ४०५७ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथे राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारणीबाबत शासकीय ई-क्लास जमिनीची पाहणी राज्य राखीव दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षकांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी लागणारी पुरेशी शासकीय जमीन खामगांव जवळ उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगांव येथे सदर प्रशिक्षण केंद्र झाल्यास अकोला, बुलढाणा, वाशिम या तीन जिल्ह्यांना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून फायदा होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र खामगांव येथे उभारणीबाबतच्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) खामगांव (जि.बुलढाणा) शिवारात राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारणीबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

-----------------

**नाशिकमध्ये मेट्रो रेल्वे किंवा रॅपिड रेल्वे सुरू करणेबाबत**

**(१७) * २८१९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ७७५ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगराचा वाढता विस्तार पाहता नाशिकमध्ये मेट्रो रेल्वे किंवा रॅपिड रेल्वे सुरू करण्याच्या अनुषंगाने नाशिक शहरातील नागरी वाहतुकीविषयक सर्वकष अभ्यास अहवाल नाशिक महानगरपालिकेने तयार करून शासनास सादर केला आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत अहवालात नाशिकमध्ये मेट्रो रेल्वे किंवा रॅपिड रेल्वे सुरू करणेबाबत करण्यात आलेल्या शिफारशींचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,
(३) अद्याप नाशिक महानगरपालिकेने नागरी वाहतुक विषयक सर्वकष अभ्यास अहवाल तयार केला नसल्यास तो केव्हापर्यंत तयार होणे अपेक्षित आहे, व त्यासाठी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहराच्या नागरी वाहतूक सर्वंकष अभ्यास अहवाल नाशिक शहराचा मास्टर प्लॉनच्या स्वरुपात सन २००७-०८ मध्ये तयार करण्यात आला आहे. सदरचा सर्वंकष वाहतुक आराखडा सुधारित करण्याचे नियोजित आहे. तथापि नाशिक महानगरपालिका क्षेत्राचा सुधारीत विकास योजना तयार करण्याची कर्यवाही प्रगतीपथावर आहे. सुधारित विकास आराखडयातील तरतुदीनुसार नाशिक शहराचा सर्वंकष वाहतूक आराखडा तयार करणे क्रमप्राप्त आहे. नाशिक महानगरपालिकेच्या सुधारीत विकास योजनेचा प्रारुप आराखडा जाहीर होताच जमिन वापर व प्रस्तावित रस्त्याचे नियोजन विचारात घेऊन सर्वंकष वाहतुक आराखडयाचे काम नाशिक महानगरपालिकेमार्फत हाती घेण्याचे नियोजित आहे.

-----------------

**राज्य लोकायुक्त व उप लोकायुक्तांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१८) * ३६७२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे लोकायुक्त यांचे पद माहे जून, २०१४ व उपलोकायुक्त यांचे पद नोव्हेंबर, २०१४ पासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे भ्रष्टाचाराच्या तक्रारींची अनेक प्रकरणे या कार्यालयात मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही पदे तातडीने भरणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लोक आयुक्त हे पद दिनांक ३ जुलै, २०१४ तसेच उप लोक आयुक्त हे पद दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून रिक्त आहे.
(२) एकूण प्रलंबित प्रकरणांपैकी २५० प्रकरणे भ्रष्टाचाराच्या तक्रारीची आहेत.
(३) दोन्ही पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी पुन्हा त्यांच्या ताब्यात देण्याबाबत**

**(१९) * ३६३१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईची निर्मिती करताना तेथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या राहत्या घरांच्या जमिनी शासनाच्या मेट्रो सेंटरने चुकीच्या पध्दतीने संपादन करुन सिडकोला हस्तांतरीत केल्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी पुन्हा त्यांच्या ताब्यात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नवी मुंबई प्रकल्पाकरीता भूसंपादन अधिनियम, १९९४ व त्याअनुषंगाने शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनाप्रमाणे संपादन करण्यात आलेले आहे. परंतु, चुकीच्या पध्दतीने संपादन करण्यात आलेले नाही. तसेच, जमीनी परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली मनपा महासभेच्या आदेशाचे उल्लंघन करुन**
**महानगरपालिका आधिका-यांनी केलेल्या मनमानीबाबत**

**(२०) * २७३६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील एन.आर.सी.या कंपनीने आपली जागा विकासकाला देवून विकसित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर या जमिन व्यवहारासाठी कंपनीला महानगरपालिकेची ना-हरकत आवश्यक असल्याने कंपनीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे अर्ज केला असता, कल्याण- डोंबिवली मनपाने माहे जून २००९ च्या सर्वसाधारण सभेत निर्णय घेऊन एन.आर.सी. कंपनीने महानगरपालिकेची असलेली थकबाकी रू.६ कोटी ६८ लाख रक्कम महानगरपालिका तिजोरित भरणा केल्याशिवाय कंपनीस जमीन व्यवहारास 'ना-हरकत प्रमाणपत्र' देऊ नये असा निर्णय महानगरपालिकेच्या महासभेने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महासभेने घेतलेल्या सदरहू निर्णयाचे जाणीवपुर्वक उल्लंघन करून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त गोंविद राठोड (सध्या वसई-विरार मनपा, आयुक्त) यांनी महानगरपालिकेच्या महासभेची मान्यता न घेताच एन.आर.सी. कंपनीला जमीन व्यवहारासाठी परस्पर 'ना-हरकत प्रमाणपत्र' दिल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे ६.५० कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन आयुक्त गोविंद राठोड यांच्या गैरकारभारामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस झालेला ६.५० कोटी रूपयांचा नुकसानाची तक्रार शासनाकडे करण्यात आल्यानंतर शासनाने या प्रकरणाच्या चौकशीसाठी ठाणे जिल्हाधिकारी यांना आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासकीय आदेशास अधीन राहून शासनास पाठविलेल्या चौकशी अहवालनुषंगाने शासनाने पुढे कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) अद्यापि, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी याप्रकरणी चौकशी करून अहवाल पाठविला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीमधील कामगारांच्या प्रश्नांबाबत तत्कालीन मंत्री, कामगार यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२/०२/२००९ रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, एन.आर.सी.कंपनीकडून महानगरपालिकेस येणे असलेल्या मालमत्ता कराची रक्कम वसूल होईल इतक्या किंमतीच्या कंपनीच्या जमिनीवर महानगरपालिकेचा प्रथम भार निर्माण करण्याकरीता महानगरपालिका व कंपनी यांनी द्विपक्षी कायदेशीर करार करावा. करारातील अटी व शर्ती परस्पर संमतीने निश्चित कराव्यात. त्यानंतर उर्वरित जमिनीच्या विक्री करीता महानगरपालिकेने कंपनीस ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे.

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने नगर विकास विभाग, शासन पत्र दि.०८/०५/२००९ अन्वये आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील व अन्य तरतुदींनुसार तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेऊन पुढील कार्यवाही करावी, असे कळविण्यात आले.

तद्नंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीशी करारनामा केला व स्वतंत्र एस्क्रो खाते उघडून दि.१४/०५/२००९ रोजी कंपनीस सशर्त ना-हरकत दाखला दिला आहे.

पालिकेकडून सदर ना-हरकत दाखला देण्यात आल्यानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१८, दि.१७/०६/२००९ अन्वये पालिका प्रशासनाने याबाबत महापालिकेची पुर्वमंजूरी न घेता शासनाच्या निर्देशानुसार थकबाकी असूनही कंपनीस परस्पर ना-हरकत दाखला दिल्याबाबत तीव्र भावना व्यक्त केल्या.

(२) नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीने अदा करावयाच्या मालमत्ता कराबाबत स्वतंत्र एस्क्रो खाते उघडून उक्त कंपनीशी करारनामा केला असून कंपनीस सशर्त ना-हरकत दाखला दिला आहे.

एन.आर.सी.कंपनीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या स्पेशल लिव्ह ॲप्लिकेशन क्र.१४४१९/२००६ च्या अनुषंगाने मा.न्यायालयाने याबाबतची कनिष्ठ न्यायालयातील अपिले निकाली निघेपर्यंत पुढील वसूली करु नये, असे आदेश दि.१८/७/२००६ रोजी पारित केले आहेत.

परिणामी या प्रकरणी मालमत्ता कराच्या वसुलीस स्थगिती आहे. मा.कनिष्ठ स्तर न्यायालयात याबाबतची अपिले सद्यस्थितीत प्रलंबित आहेत. त्यामुळे महानगरपालिका मालमत्ता कराच्या वसूलीबाबत सद्यस्थितीत कार्यवाही करू शकत नाही.

मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १३९ नुसार मालमत्ता कराचे दायत्वि एन.आर.सी.यांचे नांवे असल्याने महानगरपालिकेकडून सन २०१४-१५ अखेरपर्यंत उक्त कंपनीस महानगरपालिका कराची देयके पाठविण्यात आली आहेत. तसेच संबंधितांना याबाबत कराची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत वेळोवेळी पालिकेकडून कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत कराच्या रकमा संबंधितांकडून येणे बाकी असून त्या निर्लेखित करण्यात आलेल्या नाहीत. परिणामी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे म्हणता येणार नाही.

(३) जनहित याचिका क्र.६२/२०१० या न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.०८/०४/२०१० रोजी दिलेल्या निर्देशास अनुसरुन सदर प्रकरणी प्रशासकीय अनियमितता/गैरव्यवहार झाला आहे किंवा कसे, असल्यास त्यास कोणते अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत, याबाबत चौकशी करण्यासंदर्भात शासनाकडून जिल्हाधिकारी, ठाणे यांना सुचित करण्यात आले आहे.

(४) व (५) या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त व्हावयाचा असून याबाबत शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**नागपूर शहरातून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वरील अपघातप्रवण स्थळावर वाहतुक पोलिसांची संख्या वाढविणेबाबत**

**(२१) * ३८३७ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वरील नागमंदीर ते कन्हान कडील आडा पुलापर्यंत सुमारे १५ स्थळे अपघातप्रवण आहेत मात्र वाहतुक पोलीसांची संख्या केवळ सहा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातप्रवण स्थळांचा विचार करुन सदर रस्त्यावर वाहतुक पोलीसांची संख्या वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागपूर शहरातून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क. ७ वर नागमंदीर ते कन्हान आडा मुलापर्यंत माहे, जानेवारी, २०१५ ते फेब्रुवारी ६ ठिकाणी अपघात घडले आहेत. सदर महामार्गावर जिल्हा पोलीस, नागपूर यांचे १३ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत, तसेच, महामार्ग पोलीस मदत केंद्र, रामटेक येथे देखील १३ कर्मचारी कार्यरत आहेत. रिक्त पदे प्रतिनियुक्तीवर भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. या महामार्गावर वाहतूक सुरळीत पोलीसांची संख्या वाढविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गिरणी कामगारांना घरे देण्याच्या निर्णयाबाबत**

**(२२) * २९८१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय झाल्यानंतर सरकारच्या आदेशाप्रमाणे म्हाडाने ४६ हजार ९९ अर्जदारांमधून दिनांक २८ जून, २०१२ रोजी वा त्यासुमारास पहिली लॉटरी काढली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिली लॉटरी काढून अडिच वर्षे होऊन अद्याप गिरणी कामगारांच्या घरांचे प्रत्यक्ष वितरणाचे काम पूर्ण झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत म्हाडाकडे नोंद झालेले १ लाख ४८ हजार ८६७ कामगार आणि वारसदारांपैकी ९५ टक्के जण घरांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग-१ व २ बाबत चौकशी करण्यात आली काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व पहिल्या लॉटरीतील गिरणी कामगारांना घरे वितरीत करण्याबाबत तसेच गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४), (५) व (६) मुंबईतील १९ कापड गिरण्यांच्या कामगारांकरीता त्या गिरण्यांच्या म्हाडास उपलब्ध झालेल्या जमिनीवर एकूण ६,९४८ सदनिका बांधण्यात आल्या असून त्यापैकी २३ सदनिका संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांना वाटप करण्यासाठी राखीव ठेवून उर्वरित ६,९२५ सदनिकांसाठी दि. २८.०६.२०१२ रोजी म्हाडामार्फत सोडत काढण्यात आली. सोडतीत यशस्वी झालेल्या गिरणी कामगारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करण्यात येवून पात्र आढळलेल्या ५,२५० गिरणी कामगारांना प्रत्यक्ष घराचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला आहे. त्याखेरीज ६२५ यशस्वी अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी चालु आहे.

त्या व्यतिरिक्त ९ गिरण्यांच्या जमिनीचा ताबा म्हाडास प्राप्त झाला असून त्यापैकी ६ गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी २६३४ सदनिका व १२६५ संक्रमण गाळे बांधण्याची कार्यवाही चालु आहे व उर्वरित ३ गिरण्यांच्या जागेवर संबधीत गिरणी कामगारांकरिता ४१६० सदनिका बांधण्याचे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ५८ अन्वये बृहन्मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांकडून पुरेशी जमीन उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) च्या भाडेतत्वावरील घरकुल योजनेतील ५० टक्के सदनिका परवडणारी घरे म्हणून गिरणी कामगारांना वितरीत करण्याचा निर्णय शासनाच्या नगर विकास विभागाने घेतला असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही त्या विभागाकडून सुरु आहे.

-----------------

**मुंबई, परळ, केईएम रुग्णालय येथे कार्यरत ह्रदयरोग शस्त्रक्रिया विभागात अतिरिक्त प्राध्यापक डॉ.प्रशांत मिश्रा यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(२३) * ३५१३ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील केईएम रुग्णालयाच्या ह्रदयरोग शस्त्रक्रिया विभागात कार्यरत अतिरिक्त प्राध्यापक डॉ.प्रशांत मिश्रा यांच्याविरुध्द सहयोगी प्राध्यापक-डॉक्टर, विद्यार्थी, कर्मचारी यांना मानसिक त्रास देणे, कर्मचाऱ्याची जातीवाचक अवहेलना करणे, रुग्णांना चुकीचा सल्ला देणे यासंदर्भात अनेक तक्रारी रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्याकडे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी स्वरुपात दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनीधींनीही आरोग्य मंत्र्यांकडे याबाबत पत्राद्वारे तक्रार दाखल करुन कार्यवाही करण्याबाबत सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत या प्रकरणाच्या चौकशीची प्रक्रिया चालू आहे.

-----------------

**ठाणे जिल्ह्यात इनडोअर स्टेडीयम कार्यान्वित करण्याबाबत**

**(२४) * ३०१३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर शहरातील क्रिडा संस्कृती वाढीला लागावी या उद्देशाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास साकारण्यात आलेले एकमेव इनडोअर स्टेडीयम कार्यान्वित नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त स्टेडीयम कार्यान्वित करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
(२) व (३) सदर क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असून क्रीडा संकुल अद्याप कार्यान्वित करण्यात आलेले नाही. क्रीडा संकुलाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून महानगरपालिकेकडून उर्वरित बांधकामाचे कार्यादेश संबंधित कंत्राटदारास देण्यात आले आहेत. सद्यस्थितीत तरणतलाव, बॅडमिंटन हॉल व परिसर सुशोभिकरणाची कामे सुरु आहेत,
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास (झोपू) योजनेअंतर्गत बांधण्यात आलेली घरे दहा वर्षात न विकण्याची अट शिथील करण्याबाबत**

**(२५) * ३९६० श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास (झोपू) योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमधील घरे किमान दहा वर्षे विकता येत नसली तरी सुध्दा प्रत्यक्षात इमारतीमधील घरे अवैध मार्गाने विकली जात असल्यामुळे गरीब व सर्वसाधारण कुटूंबांना त्रास सहन करावा लागत असून घरे हस्तातंरणामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूलही बुडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास झोपडपट्टी पुनर्विकास (झोपू) योजनेअंतर्गत बांधण्यात आलेली घरे दहा वर्षात न विकण्याची अट शिथील करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशत: हे खरे आहे.

झोपडीवासियांचे जिवनमान सुधारावे या हेतूने सर्व सोयी-सुविधायुक्त मोफत घर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून देण्यात येते. झोपडीवासियांना दिलेल्या सदनिकांची लगेच विक्री / हस्तांतर झाल्यास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा उद्देश सफल होणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(E) आणि बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ कलम ३३(१०) मधील परिच्छेद १.१८ मधील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन इमारतीमधील सदनिका / गाळा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून १० वर्षापर्यंत हस्तांतरण करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत हे निर्बंध योग्यच आहेत.

जनहित याचिका क्रमांक ११९/२००९ व १४३/२००९ मधील मा.मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेवून अवैध हस्तांतरण रोखण्याकरीता व अवैध हस्तांतरणाच्या प्रकरणी निष्कासनाची कार्यवाही करुन गाळा ताब्यात घेण्यात येण्याची कार्यवाही करण्यासाठी दिनांक १९ मे, २०११ रोजीच्या परिपत्रक क्र. १२५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत उपजिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली दक्षता पथक स्थापन करण्यात आले आहे. या दक्षता पथकाने १६२ प्रस्तावातील १४१४ अनधिकृत वास्तव्य करणाऱ्या लोकांची प्रकरणे निष्कासनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविली असून ३८ सदनिका ताब्यात घेतल्या असून १३७६ प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर पोलीस विभागाअंतर्गत मोटर परिवहन विभागात वाहनाची दुरुस्ती करीता लागणाऱ्या सुट्टया भागाच्या खरेदीमध्ये होत असलेला गैरव्यवहार

**(२६) * २९४५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर पोलीस विभागाअंतर्गत मोटर परिवहन विभागात वाहनाची दुरुस्तीकरीता सुटे भाग खरेदी करतांना पुरवठा करण्याकरीता नेमलेल्या पुरवठादाराकडून बोगस स्पेअर्स पार्ट देवून रेकार्डवर नामांकित कंपनीचे सुटे भाग दाखवून मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत चौकशी करुन संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मार्वे ते मढच्या सागरी किनाऱ्यास आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याबाबत

**(२७) * ४१०९ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मार्वे ते मढच्या सागरी किनाऱ्यांवर मुंबईसह देशभरातून पर्यटक पर्यटनास येत असून, त्याठिकाणी किनाऱ्यावर शौचालय, पिण्याचे पाणी, पर्यटकांना बसण्यासाठी आसन व्यवस्था यासारख्या प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व याठिकाणी पर्यटकांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन सागरी किनाऱ्यास आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंबईतील मार्वे ते मढपर्यंतच्या सागरी किना-यामध्ये मार्वे, आक्सा व मढ असे एकूण ३ सागरी किनारे समाविष्ट असून सदर किना-यांपैकी मार्वे किना-यावर चार आसनी (दोन स्त्रिया व दोन पुरुष) स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच आक्सा व मढ ही दोन स्थळे "क" वर्गीय पर्यटन स्थळे म्हणून घोषित केली आहेत. तसेच आक्सा समुद्र किना-यावर जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पुरुषांसाठी ५ आसनी व स्त्रियांसाठी ५ आसनी शौचालय बांधण्यात आलेले आहेत. मार्वे ते मढ सागरी किना-यांसाठी जिल्हा वार्षिक योजना-पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत सन २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीत खालील कामांसाठी रु. ४५८.०० लक्ष निधी मंजूर केला आहे. यापैकी काही कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

**कामाचा तपशील :** सौदर्यीकरणांतर्गत गार्डनची कामे, संरक्षण भिंत, इंटरनल पेव्हमेंट रोड, शौचालय, पदपथ, वाहनतळ, सौदर्यीकरण, जॉगिंग ट्रॅक, गार्डन सुधारणा, पाण्याची कारंजे, पदपथ, गार्डनमधील आसनव्यवस्था, खेळाचे साहित्य, दिव्यांची सोय, पेअरगोला शेड, पाण्याची टाकी इ.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांच्याकडून मार्वे व आक्सा बीच येथे शौचालयाच्या बांधकामासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत अंदाजपत्रके मागविण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आर्णी पोलीस (जि.यवतमाळ) ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या ८३ गावात पोलीस ठाण्यांची व कर्मचा-यांची संख्या वाढविणेबाबत**

**(२८) * ३९२१ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत एकूण ८३ गावे असून सदर गावांची लोकसंख्या दोन लाखावर असताना त्यांच्या सुरक्षेसाठी केवळ ४९ पोलीस कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस स्टेशनची उभारणी करुन पुरेशा प्रमाणात पोलिसांची संख्या वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे. सद्य:स्थितीमध्ये पोलीस ठाणे आर्णी येथे एकूण ५२ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) व (३) लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये, राज्य पोलीस दलातील विविध घटकांसाठी पाच टप्प्यात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची ६१,४९४ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्याअंतर्गत दि.४.३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये पहिल्या टप्प्यात पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे अधीनस्त दोन नवीन पोलीस ठाण्यासह विविध संवर्गात २९२ पदे निर्माण करण्यात आली आहेत .

-----------------

**राज्याच्या सागरी सुरक्षेसंबंधी करावयाच्या उपाययोजनाबाबत**

**(२९) * ३३५४ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सागरी मार्गे दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या दहशतवादी हल्ल्यासंबंधी सागरी सुरक्षेबाबत उच्च न्यायालयाने राज्य शासनाकडे खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहशतवादी संघटनांच्या सतत केंद्रस्थानी असलेल्या मुंबई शहराच्या सागरी सुरक्षेसाठी लष्करासारख्या संरक्षक तुकडया तयार करण्यात याव्यात अशी शिफारस मुंबई पोलीसांतर्फे सरकारला करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अरबी समुद्रात स्फोटकांनी भरलेली बोट भारताच्या सागरी हद्दीत घुसल्याने सदरील बोटीवर तटरक्षक दलाने कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या घटनेमुळे राज्याच्या सागरी सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच, राज्याच्या सागरी सुरक्षेसंबंधी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(७) अद्‍याप, उक्त प्रश्नांबाबत कोणतीही कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.४१/२०११ अन्वये सागरी सुरक्षेसंदर्भात प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दि.१३.०१.२०१५ रोजी दिलेले आहेत.

(२) जानेवारी, २०१५ मध्ये मुंबई शहराच्या सागरी सुरक्षेसाठी लष्करासारख्या संरक्षक तुकड्या तयार करण्याबाबतची शिफारस मुंबई पोलीसांकडून केली नाही.

(३) सदर घटना गुजरात राज्याजवळ अरबी समुद्रात घडलेली आहे.

(४), (५) व (६) राज्याच्या सागरी सुरक्षेसाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाच्या २८, राज्य शासनाच्या २९ व जुन्या १५ बोटींमार्फत सागरी गस्त करण्यात येते. सागरी किनारा सुरक्षेच्या दृष्टीने सागरी जिल्हयामध्ये २५ जुनी पोलीस स्टेशन असून फेज १ अंतर्गत १२ व फेज २ अंतर्गत ६ नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्यात आलेली आहेत. तसेच जुनी ५९ व नवीन ३२ अशी एकूण ९१ चेकपोस्ट कार्यरत आहेत. सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये काही संशयास्पद घटना आढळल्यास त्याची माहिती मिळविण्यासाठी सागरी किना-यावरील गावामध्ये नागरीकांची सागरी सुरक्षा दले निर्माण करण्यात आलेली आहेत. सागरी पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना कोस्ट गार्ड मरीन पोलीस प्रशिक्षण देण्यात येते. तसेच वेगवान बोटी चालविण्यासाठी पोलीस तांत्रिक कर्मचा-यांची कायम स्वरुपी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधनावर ६३ खाजगी सेकंड क्लास मास्टर व ३५ फर्स्ट क्लास इंजिन ड्राईव्हर अशी एकूण ९८ तांत्रिक पदे ११ महिन्यांकरीता भरण्यात आली आहेत. सागरी सुरक्षेकरीता टोल फ्री हेल्पलाईन क्र.१०९३ सुरू करण्यात आलेला आहे. सागरी

सुरक्षेच्या दृष्टीने मच्छिमार व बिगर मच्छिमार बोटींची पुर्ननोंदणी करण्यात येते व मच्छिमारीसाठी जाणा-या इसमांना बायामेट्रीक कार्ड देण्यात येते. महाराष्ट्राच्या सागरी किना-यावर ५ रडार यंत्रणा असून त्याचे नियंत्रण भारतीय तटरक्षक दलाकडून करण्यात येते. तटरक्षक दलातर्फे विविध केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या सुरक्षा विभागांच्या प्रतिनिधीची गुप्तवार्ता संदेशासंबंधी देवाण घेवाण करण्यासाठी बैठक होते. उपरोक्त उपाययोजनेद्वारे सागरी सुरक्षेची पुरेशी दक्षता घेण्यात येते.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जात पंचायतीच्या अनिष्ट प्रथा मोडीत काढण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत**

**(३०) * ३१४५ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जात पंचायतच्या दहशतीच्या अनेक घटना घडत असून त्यांचे अमानुष न्याय निवाडे व शिक्षेच्या फतव्यामुळे पिडीत कुटूंबातील व्यक्तींना जीवास मुकावे लागत आहे तर काहींना जात बहिष्कृत केले जात असून त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जातपंचायती संविधान विरूध्द असून त्यांच्या मनमानी कारवाई विरूध्द कायदा बनविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) सध्या अशा प्रकरणांमध्ये भारतीय दंड विधान संहिता कलम १५३ (अ) अन्वये कारवाई करण्यात येत आहे. तथापि, सामाजिक बहिष्कारासारखी अनिष्ट प्रथा मोडीत काढण्यासाठी कायदा तयार करण्याची बाब तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईत रस्ते व पदपथ यांचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारांवर करावयाची कारवाई**

**(३१) * ४२१६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जोगेंद्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत निष्कृष्ट दर्जाचे पेव्हर ब्लॉक वापरण्यात आल्यामुळे रस्ते व पदपथ उध्दवस्त झाले असल्याबाबत नागरिकांनी संबंधितांकडे वारंवार तक्रार करण्यात येवूनही अद्यापी रस्त्यांची व पदपथांची दुरुस्ती करण्यात आली नसून निकृष्ट दर्जाचे काम करणा-या ठेकेदारांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची व पदपथांची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच निकृष्ट काम करणा-या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पेव्हर ब्लॉक लावण्याच्या कामांची निविदा काढताना निविदेत दोष दायित्व कालावधीची अट अंतर्भूत करण्यात येते, त्याप्रमाणे दोष दायित्व कालावधीत असलेल्या रस्ते व पदपथ खराब झाल्यास किंवा निकृष्ट दर्जाचे काम आढळल्यास, सदर काम संबंधित ठेकेदाराकडून विनामूल्य करुन घेण्यात येते व संबंधित ठेकेदारावर यथोचित कारवाई करण्यात येते. निकृष्ट काम करणा-या ठेकेदारांवर कृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालये व प्रमुख अभियंता (रस्ते) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या तीन विभागाच्या उप प्रमुख अभियंता कार्यालयांमार्फत, विविध कंत्राटात अंतर्भूत असलेल्या निविदेतील अटी-शर्तीनुसार कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उस्मानाबाद जिल्ह्यासह मोहोळ, माढा, उत्तर सोलापूर, परंडा, तुळजापूर येथील पोलिस ठाण्यात पोलीस कर्मचा-यांची संख्या वाढविण्याबाबत**

**(३२) * ४२७८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यासह मोहोळ, माढा, उत्तर सोलापूर, परंडा, तुळजापूर तालुक्याच्या हद्दीपर्यंत वैराग पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र विस्तारलेले असल्याने वैराग भागातील ७४ गावांची कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने नियंत्रण ठेवणा-या वैराग पोलीस ठाण्यात केवळ २९ पोलीस कर्मचा-यांवरच कारभार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैराग पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी यांची संख्या वाढविण्याबाबत वारंवार मागणी करूनही प्रशासनाने अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हेगारी रोखण्याबाबत शासनाने पोलीस कर्मचारी यांची भरती करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वैराग पोलीस ठाण्यात ३१ पदे मंजुर असुन त्यापैकी २९ कर्मचारी हजर आहेत. पोलीस मुख्यालयाकडुन ५ अतिरीक्त कर्मचारी देण्यात आले असुन सध्या एकूण ३४ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

बार्शी तालुक्यातील वैराग पोलीस ठाणे हद्दीतील ७४ गावामधील २३ गावे नव्याने निर्माण होणा-या बार्शी तालुका पोलीस ठाण्यामध्ये समाविष्ठ करण्यात येणार आहे. त्यासाठी विविध संवर्गातील ६५ पदे निर्माण करण्यास शासनाने दि.०४/३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे डिकळस येथे गजाननबुवा यांच्या स्मरणार्थ मेमोरिअल भवन बांधणेबाबत**

**(३३) * ४५२१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डिकळस, (ता.कर्जत, जि.रायगड) येथील भजन सम्राट कै.गजाननबुवा पाटील यांचे स्मरणार्थ मेमोरिअल भवन बांधण्यासाठी कर्जत नगरपरिषदेने नवीन विकास योजना सन २००९-२०२१ च्या आराखडयात क्र.११ ने आरक्षित जागा ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयास जिल्हा नगर रचनाकार यांनी दिनांक २५ एप्रिल २००६ रोजी वा त्यासुमारास मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आराखडयास मंजूरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कर्जत शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार "आ.क्र.११-गजाननबुवा मेमोरिअल भवन" या करिताचे आरक्षण असुन, या आरक्षणाकरिता समुचित प्राधिकरण गजाननबुवा मेमोरिअल ट्रस्ट ही संस्था आहे.

(२) नाही.

(३) व (४) विषयांकित प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे प्रलंबित आहे.

-----------------

**पालघर शहराच्या प्रारुप विकास आराखड्यातील त्रूटी दुरुस्त करण्याबाबत**

**(३४) * ४६३३ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर शहराच्या प्रारुप विकास आराखडयातील त्रुटी दुरुस्त करण्याची ग्वाही नगर रचना विभागाने देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने संघर्ष समितीने दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघर्ष समितीच्या मागण्यांचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने आंदोलकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पालघर शहराच्या प्रारुप विकास योजनेमधील त्रुटी दुर करण्याअनुषंगाने प्रारुप विकास आराखडा विरोधी संघर्ष समितीने दिनांक २९/१/२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले आहे.
(२) होय.
(३) पालघर शहराची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये मंजुरीकरिता सादर झाली आहे. सदर प्रारुप विकास योजना मंजुरीबाबत निर्णय घेताना प्राप्त हरकती/सुचना/निवेदने विचारात घेऊन तसेच नियोजनाच्या दृष्टीकोनातून विचार होऊन निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील नरिमन पॉइंट, वांद्रे-कुर्ला संकुल, लोअर परळ व अंधेरी येथे नवीन बिझनेस झोन तयार करण्याबाबत**

**(३५) * ४६५९ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नरिमन पॉइंट, वांद्रे-कुर्ला संकुल, लोअर परळ व अंधेरी येथे नवीन बिझनेस झोन तयार करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) ही योजना प्रत्यक्षात केव्हा अंमलात आणण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मिहान प्रकल्पात अनेक कंपन्यांनी तेथे जमिनी खरेदी करुन अद्याप उद्योग सुरु न केल्याबाबत**

**(३६) * ५११२ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिहान ह्या प्रकल्पामुळे हजारो बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिहानमध्ये स्थानीक लोकांना किती प्रमाणात रोजगार मिळाला आहे,
(३) अनेक कंपन्यांनी तेथे जमिनी खरेदी करून अद्याप उद्योग सुरु केलेले नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) एकूण सुमारे ७५६० लोकांना रोजगार मिळाला असून त्यामध्ये प्रामुख्याने स्थानिक लोकांचा समावेश आहे.

(३) होय.

(४) उद्योग सुरू न केलेल्या कंपन्यांपैकी ९ कंपन्यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या आहेत तसेच उर्वरीत कंपन्यांना देखील कारणे दाखवा नोटीस देऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**ताडदेव येथे मुंबई पोलीसांच्या घरासाठीचा आरक्षित भूखंड विकासकास दिल्याबाबत**

**(३७) * ५३८६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीसांसाठी घरे बांधण्याकरीता ताडदेव येथे आरक्षित ठेवण्यात आलेला दोन एकरचा भूखंड झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासाठी बिल्डरला देण्यात आल्याचा प्रकार माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पोलीसांना घरे देण्याबाबत व त्यांच्याकरिता आरक्षित ठेवलेले भूखंड परस्पर बिल्डरला देणा-या विरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**म्हाडामार्फत वितरीत करण्यास येणा-या अल्प उत्पन्न गटातील**
**सदनिकांच्या किंमती नियंत्रित करण्याबाबत**

**(३८) * ५४८२ श्री.विजय सावंत :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण व मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या विविध योजनांमधील अल्प उत्पन्न गटाच्या सदनिकांची किंमत ५ % ते ७ % इतकी कमी करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) तसेच, म्हाडामार्फत वितरित करण्यात येणा-या सदनिकांच्या किमती नियंत्रित करण्याबाबत शासनाने कोणते धोरण आखले आहे वा आखण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अशा प्रकारचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन नाही.

म्हाडाच्या घरांच्या किंमती कमी होण्याच्या दृष्टीने म्हाडा प्राधिकरणाने दि. २२.०५.२०१४ व दि. २२.०७.२०१४ रोजीच्या ठरावानुसार सुधारीत धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार विविध योजनांमधील अल्प उत्पन्न गटाच्या सदनिकांची किंमत ५ टक्के ते ७ टक्के इतकी कमी होणे अपेक्षित आहे.

(२) म्हाडाच्या घरांच्या किंमती कमी होण्याच्या उद्देशाने म्हाडाचा ठराव क्रमांक ६६५८, दि. २२.०५.२०१४ व ठराव क्र. ६६६७, दि. २२.०७.२०१४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१. जमीन व सुधारणा खर्च तसेच बांधकाम खर्चावर व्याज आकारणी द.सा.द.शे. १४.७५% वरुन मागील आर्थिक वर्षामध्ये म्हाडाच्या गुंतवणुकीवर मिळालेल्या सरासरी व्याजाचा दर अधिक १% असा सुधारित केला आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षाकरीता हा दर १०.३०% इतका कमी झाला आहे.

२. विक्री किंमत निश्चित करताना अनपेक्षित बाबींपोटी आकारण्यात येणारा प्रचलित दर ५% ऐवजी १% इतका कमी केला आहे.

३. म्हाडाच्या नफ्याचे प्रमाण मध्यम उत्पन्न गटाकरीता प्रचलित १५ ते २० टक्केऐवजी ५ ते १५ टक्के या प्रमाणात व संबंधित प्रकल्पातील गाळे विक्रीची व्यवहार्यता विचारात घेऊन आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

४. व्यवस्थापन खर्च प्रचलित १% वरुन ०.५% इतका कमी केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दमणगंगा-पिंजाळ नदी प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्याबाबत**

**(३९) * ५५४१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराची भविष्यात पाण्याची मागणी वाढणार असल्याने दमणगंगा-पिंजाळ नदी प्रकल्प कार्यान्वित झाल्यास मुंबई शहराला १५८६ एमएलडी अतिरिक्त पाणी मिळणार असल्याने या प्रस्तावित प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करण्यासाठी या प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प घोषित करावा, अशी मागणी शिवसेना आमदार श्री. सुनिल प्रभू यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, यासंदर्भात कोणताही निर्णय घेतला नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, मुंबई शहराला पाणी पुरवठा करणा-या 'दमणगंगा-पिंजाळ नदी जोड प्रकल्प' राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्याबाबत तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर दिनांक ३०.०९.२०११ च्या पत्रान्वये तत्कालिन मा.पंतप्रधान महोदयांना तसेच विद्यमान मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर दिनांक १६.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये, मा.केंद्रीय मंत्री, जलसंधारण यांना विनंती करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरण केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

-----------------

## जागतिक बॅंक प्रकल्प योजनेच्या कोड क्र. ०५१ बी.सी. एस.सी. प्रवर्गातून मालवणी (मुंबई) येथील भूखंड अर्जदारांना वितरीत करण्याबाबत

**(४०) * ५६९९ डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक बॅंक प्रकल्प योजनेच्या कोड क्र. ०५१ बी.सी. एस.सी. प्रवर्गातून मालवणी (मुंबई) येथील भूखंड अर्जदारांना वितरीत करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ जुलै, २०१२ रोजी वा त्यासुमारास गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना पत्राव्दारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप उक्त अर्जदारांना भूखंड वितरीत करण्यात न आल्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, भूखंड वितरणाबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मा.लोकप्रतिनिधींनी दि. २४.०७.२०१२ रोजी व त्या सुमारास म्हाडास दिलेल्या पत्राचा शोध जागतिक बॅंक प्रकल्प या कार्यालयातील अभिलेखात घेतला असता ते प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) मुंबई मंडळाच्या जागतिक बॅंक प्रकल्पांतर्गत ४५११७ निवासी भूखंडाबाबतच्या जाहिराती सन १९८४ ते १९९४ या कालावधीत देण्यात आलेल्या होत्या. सदर कालावधीमध्ये दिनांक ३१.०३.१९९५ पर्यंत ३५६९५ भूखंडाचा ताबा देण्यात आला.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९.०३.१९९५ च्या आदेशान्वये Status - quo देण्यात आल्यामुळे सन १९९५ ते २००३ या कालावधीमध्ये भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही बंद करण्यात आली होती. तथापि, भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार चारकोप - IV, गोराई - III, वर्सोवा व मुलूंड येथील वसाहती मधील क्षेत्र वगळल्यामुळे प्राधिकरणाच्या क्र. ५९७५, दि. १०.११.२००३ च्या ठरावानुसार उर्वरित भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येऊन एकूण ४५११७ पैकी ३८२०७ भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही पूर्ण झाली.

जागतिक बॅंक प्रकल्प योजनेच्या कोड क्र. ०५१ बी.सी.एस.सी. प्रवर्गातून मालवणी (मुंबई) येथील ३३१ अर्ज पोलीस निरीक्षक, पंतनगर, घाटकोपर, मुंबई पोलीस ठाणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले असता पंतनगर पोलीस ठाण्याच्या अहवालानुसार सदर अर्जापैकी एकूण ३०४ अर्ज बनावट कागदपत्रासह म्हाडाला सादर केल्याचे निष्पन्न झाले. या १६ आरोपींविरुध्द मा.महानगर दंडाधिकारी, ३१ वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई यांचे न्यायालयात खटला क्र. ९८२/पी/९७ दाखल करण्यात आलेला आहे.

दरम्यानच्या कालावधीत मा.उच्च न्यायालयाने त्यांच्याकडील रिट याचिका क्र. ३३४६/२००४ मध्ये दि. ०६.१०.२००५ रोजी कांदळवन (Mangroves) पासुन ५० मिटर अंतरातील क्षेत्रामध्ये सर्व प्रकारच्या विकास कामास बंदी घातलेली आहे, सदर अंतरिम आदेशामुळे बाधित होणाऱ्या वरील नमुद प्रकल्पातील प्रस्तावांना अंतरिम स्थगितीच्या

आदेशातून सुट मिळण्याकरीता पर्यावरण विभागाने दि. २९.०७.२०१३ रोजी दिलेल्या परवानगीनुसार मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, म्हाडा यांनी मा.उच्च न्यायालयात Notice of Motion दि. १२.१२.२०१४ रोजी दाखल केली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे होणारे आदेश व पंतनगर पोलीस स्टेशन कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अहवालाच्या व मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहराचा विकास आराखडा तयार न करताच रस्त्यांचे केलेले कॉक्रिटीकरण**

**(४१) * ५७६१ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरात रस्त्यांचे रुंदीकरण न करताच कॉंक्रिटीकरण करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कामे ही विकास आराखडा तयार न करताच करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणात दोषी असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

अंबरनाथ नगरपरिषदेने ठराव क्र. १६६, दिनांक ०१.११.२०११ अन्वये प्रत्येक वॉर्ड मधील मुख्य रस्ते कॉक्रिटीकरणाचा ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार अंबरनाथ शहरामधील पूर्व-पश्चिम विभागातील विकास आराखड्याप्रमाणे असलेल्या रस्त्याचे रूंदीकरण झालेल्या रस्त्यांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेऊन निविदाद्वारे कामे करण्यात आली आहेत ज्या रस्त्याचे रुंदीकरण अद्यापी करावयाचे बाकी आहे अशा रस्त्याचे अद्यापी कॉक्रिटीकरण करण्यात आलेले नाही.

(२) अंबरनाथ शहराच्या विकास आराखड्यास सन २००८ मध्ये सन २००५ च्या विकास आराखड्यामधील इपीसह मंजुरी प्राप्त झाली असून सन २००८ च्या विकास आराखड्यानुसारच कामे करण्यात येत आहेत.

(३), (४) व (५) विषयाधीन कामे अंबरनाथ शहराच्या विकास आराखड्यानुसारच करण्यात आली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद महापालिकेस आय.डी.बी.आय.बँकेने प्रतिवर्षी लावलेला २ कोटी रुपयांचा दंड**

**(४२) * ५९७१ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिनीसाठी आय.डी.बी.आय.बँकेकडून २०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्ज प्रकरणाच्या अटी शर्तीनुसार मालमत्ता तारण देण्यास दिरंगाई केल्याने बँकेने १ % प्रमाणे प्रतिवर्ष २ कोटी जास्तीचे व्याज लावले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर प्रकरणी दोषी असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेने आयडीबीआय बँकेकडून एकूण रक्कम रुपये १९२.२४ कोटी इतके कर्ज घेतले असून त्यापैकी रुपये ९४.५० कोटी इतके कर्ज समांतर जलवाहिनी वॉटर पेमेंट रिझर्व्ह अकाऊंट मध्ये जमा करणेकरीता घेतले आहे. हे खरे आहे.

(२) औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिनी प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे वॉटर पेमेंट रिझर्व्ह अकाऊंट मध्ये जमा करण्यासाठी घेतलेल्या रूपये ९४.५० कोटी कर्जाच्या हप्त्यावर आवश्यक मालमत्ता तारण न ठेवल्यामुळे दिनांक १ एप्रिल, २०१३ ते २८ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीसाठी रुपये १.७१ कोटी इतके अतिरीक्त व्याज बँकेने औरंगाबाद महानगरपालिकेस आकारणी केलेले आहे. तर उर्वरीत कर्ज रक्कम ९७.७४ कोटी कर्जाच्या हप्त्यावर आवश्यक मालमत्ता तारण न ठेवल्यामुळे दिनांक २४ मे, २०१२ ते ३१ मार्च, २०१४ कालावधीत रुपये १.८० कोटी इतके अतिरीक्त व्याज बँकेने औरंगाबाद महानगरपालिकेस आकारणी केलेले आहे.

(३) (४) व (५) एकूण कर्ज १९२.२४ कोटी पैकी रुपये ९७.७४ कोटी कर्जाच्या रकमेसाठी रुपये १५६ कोटी किंमतीची मालमत्ता तारण ठेवल्यामुळे बँकेकडून ९७.७४ कोटी कर्जाच्या रकमेवरील अतिरीक्त व्याज दिनांक १ एप्रिल २०१४ पासून बंद केलेले आहे. उर्वरीत मालमत्ता तारण ठेवण्याची कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

**मुंबई महापालिकेअंतर्गत येणा-या उर्दू शाळांना संगणक व इतर साहित्य पुरविण्यासाठी शासनाने दिलेला निधी विहित मुदतीत खर्च न केल्याबाबत**

**(४३) * ५९८४ श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेअंतर्गत येणा-या उर्दू शाळांना संगणक व इतर साहित्य पुरविण्यासाठी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१० रोजी वा त्यासुमारास शासनाने २७ लाख रुपयांचा निधी दिला असून सन २०१३-२०१४ पर्यंत उक्त निधी खर्च करावयाचा असताना खर्च करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विहित मुदतीत निधी खर्च न करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्‌याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी सकृतदर्शनी प्रशासकीय दिरंगाई झाल्याचे निदर्शनास आल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांचेमार्फत चौकशी चालू आहे. सदर चौकशी पूर्ण झाल्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही केली जाईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमळनेर (जि.जळगाव) शहरात साने गुरूजींचे स्मारक उभारण्याचा विचाराधीन प्रस्तावाबाबत**

**(४४) * ६०४९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर (जि.जळगाव) शहरात साने गुरुजींचे स्मारक उभारण्याचा व त्यासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी शासकिय जमीन व बांधकामासाठी आवश्यक तेवढा निधी किती कालावधीत मंजूर होईल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठान, अमळनेर यांनी साने गुरुजींच्या स्मारकासाठी गट क्र. १२२/१ अ मधील ७.३५ हेक्टर जमीन नाममात्र भाडे तत्वावर देण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे मागणी केली आहे. तथापि, सदरची जमीन ही शासकीय गुरचरण जमीन असल्याने आणि गायरान, गुरचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील शासकीय जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर न करण्याबाबतचा निर्णय महसूल व वन विभागाने घेतला आहे.
(२) सद्‌यस्थितीत जमिन उपलब्ध झालेली नसल्याने निधी मंजूर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देवळाली (जि.नाशिक) येथील लष्करी अधिकाऱ्याने उपनगर पोलिस ठाण्यावर हल्ला चढवून नासधूस केल्याबाबत**

**(४५) * २८५० डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळाली (जि.नाशिक) येथील एका लष्करी अधिका-याने नातेवाईकांवर गुन्हा दाखल केल्याने उपनगर पोलिस ठाण्यावर २० ते २५ लष्करी जवानांनी हल्ला चढवून पोलिस ठाण्याची नासधूस करुन तेथील कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी या लष्करी जवानांवर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर गुन्ह्यात १९ लष्करी अधिका-यांविरुद्ध उपनगर पोलीस स्टेशन येथे २४/२०१५ गुन्हा नोंद आहे.

(२) सदर गुन्हा भा.द.वि.कलम १२०(ब), १४३, १४७, १४९, ३३२, ३४२, ३५३, ३५४, ४५२, ४२७, ५०४, ५०६ सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंधक अधिनियम १९९५ मधील कलम ३ अन्वये उपनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२४/२०१५ दि.१४/०१/१५ रोजी गुन्हा नोंद आहे.

तसेच न्यायालयाचे अनुमतीने भा.द.वि. कलम ३३३ हे दि. ५/२/२०१५ रोजी वाढविण्यात आले आहे. सदर गुन्ह्यातील १८ आरोपींना दि.१४/०१/१५ रोजी २१.०० वा अटक करुन दि.१५/०१/१५ रोजी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने या आरोपींचा जामीन मंजूर केला आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या ग्रंथालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४६) * ३७९९ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या शिक्षकांसाठी चालविल्या जाणाऱ्या ग्रंथालयातील ग्रंथपाल, लिपिक, परिचर, सेवक, टंकलेखक तसेच शिपाई अशी एकुण २७ पदे रिक्त असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्तीनंतर सर्व प्रकारचे भत्ते व निवृत्ती वेतन मिळण्यासाठी शिक्षकांना या ग्रंथालयातून ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांना सदर प्रमाणपत्र पदे रिक्त असल्यामुळे मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर रिक्त पदे केव्हापर्यंत भरणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षकांसाठी चालविल्या जाणाऱ्या ग्रंथालयातील ग्रंथपाल या संवर्गातील १ पद, ग्रंथपाल लिपिक ९ पदे, ग्रंथालय परिचर ४ पदे व ग्रंथालय सेवक १ पद अशी एकूण १५ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(५) सदर रिक्त पदे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत डिसेंबर, २०१५ पर्यंत भरणे अपेक्षित आहे.

-----------------

**अकोला महानगरपालिकेच्या महत्वकांक्षी भूमिगत गटार योजनेकरिता केंद्र शासनाकडून मिळालेला निधी खर्च न केल्याबाबत**

**(४७) * २९२७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या महत्वकांक्षी भूमिगत गटार योजनेकरिता केंद्र शासनाकडून सन २००७ मध्ये ५६ कोटी रुपये अकोला महानगरपालिकेला देण्यात आलेली रक्कम खर्च न केल्यामुळे बँकेत अदयापी पडून असून सद्य:स्थितीमध्ये व्याजासह ७३ कोटी रुपयांवर पोहचलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत योजना मार्गी न लावल्यास सदर निधी परत केंद्राकडे जाण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत अकोला महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेस केंद्र शासनाने सन २००७ साली मान्यता दिली असून केंद्र शासनाकडून पहिला हप्ता रुपये ४९.९८ कोटी व राज्य शासनाकडून ६.२३ कोटी असे एकूण ५६.२१ कोटी निधी अकोला महानगरपालिकेस ऑक्टोबर, २००९ मध्ये वितरीत करण्यात आला होता. सद्यस्थितीत व्याजासह सदर रक्कम अंदाजे रुपये ७६.२६ कोटी पर्यंत पोहचलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) अकोला महानगरपालिकेद्वारा भूमिगत गटार योजनेच्या मुख्य कामाच्या निविदेप्रक्रियेत झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्यामार्फत चौकशी करुन प्राप्त चौकशी अहवालानुसार दिनांक ०५ जून, २०१२ च्या शासन निर्णयान्वये अकोला शहर भुयारी गटार योजनेच्या निविदा स्वीकृतीचा व कंत्राटदारास Mobilization Advance देण्याबाबतचा अकोला महानगरपालिकेचा स्थायी सभेचा ठराव विखंडित केलेला आहे. तदनंतर जानेवारी २०१३ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत अकोला शहर भूमिगत गटार योजनेचा प्रस्ताव सन २०११ ची लोकसंख्या विचारात घेऊन सदर प्रकल्पांचा तांत्रिक आराखड्यात आवश्यक सुधारणा करुन त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यास तांत्रिक मान्यता देण्याबाबत निदेश देण्यात आले होते. तथापि सुधारीत प्रस्ताव अकोला महानगरपालिकेकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेमध्ये कामगारांना कायमस्वरुपी कामावर सामावून घेण्याबाबत**

**(४८) * ३१९० श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये अनेक वर्षापासून समूहसंघटीका या कंत्राटी पध्दतीने काम करित असून अद्याप त्यांना कायमस्वरुपी कामावर सामावून घेण्यात आले नाही ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या कामगारांना शासनाच्या सेवासुविधांचा फायदा मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेतील समुहसंघटीका यांना कायम करण्याबाबत राज्यशासन आदेश देणार आहे काय,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेकडे अस्थायी पदावर सहा महिन्यांकरीता करार पध्दतीने मासिक एकवट मानधनावर समूहसंघटकांकडून सेवा घेणेत येते. दर सहा महिन्यांनी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन प्रगट मुलाखतीसाठी (Walk in interview) बोलाविण्यात येवून सहा महिने मुदतीसाठी समूहसंघटक या पदावर निवड केली जात असल्याने, त्यांना कायमस्वरुपी कामावर सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वरळी येथे नेहरु तारांगणालगत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना शासकीय बोधचिन्हांचा केलेला गैरवापर**

**(४९) * ३८०६ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथे नेहरु तारांगणालगतच्या सुमारे १७ एकर जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी मुंबई महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कोणतीही परवानगी न घेता लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चरने महानगरपालिका व एसआरएची बोधचिन्हे बेकायदा वापरुन व शासनाच्या नावाचा गैरवापर करुन रहिवाशांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) वरळी, मुंबई येथील न.भू.क्र.१७/४७ (पै) या भूभागावर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३क(१) मधील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यास शासनाने दिनांक १४.८.२०१० रोजीच्या आदेशान्वये मंजूरी दिली आहे. त्यास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ३१.१२.२०१२ रोजी विकासक म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेस व त्यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांना आशयपत्र दिले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.६४, दिनांक १४.१०.२०१४ नुसार विकासकाने स्वखर्चाने योजनेच्या ठिकाणी मराठी व इंग्रजी भाषेतील नामफलक बोधचिन्हासह लावणे आवश्यक आहे. तशी अट उपरोक्त आशयपत्रामध्ये देखील घातलेली आहे. त्यानुसार मे.लोखंडवाला इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा नावाचा फलक लावलेला आहे. शासनाने ३क अन्वये दिलेले आदेश अद्याप रद्द केलेले नाहीत. तथापि, उपरोक्त आशयपत्राची मुदत संपलेली असल्यामुळे योजनेच्या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा लावलेला नामफलक काढून टाकण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात येईल.

सदरहू भूखंडावर बृहन्मुंबई महानगरपालिका व एसआरएची बोधचिन्हे परवानगी न घेता लावलेली आहे, अशा आशयाची दिनांक ८.१.२०१५ रोजीची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करण्यात आली असून सदरच्या नामफलकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बोधचिन्ह आढळलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ट्रॅफिक पोलीस नेमण्याबाबत

**(५०) * ३२७५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अमृतांजन पूलाखाली आठवडयाला किमान एकतरी अपघात होऊन वाहतूकीचा खोळंबा होत असतो, जड वाहने-ट्रक-ट्रेलर यांच्यासाठी डावी लेन असून देखील ती उजव्या लेनने चालताना दिसतात, या संपूर्ण मार्गावरील ठराविक ठिकाणे सोडल्यास ट्रॅफिक पोलिस दिसतच नाहीत, असे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरी आहे काय,

(२) असल्यास, या द्रुतगती मार्गावर पुरेशा प्रमाणात ट्रॅफिक पोलीस नेमण्यासाठी शासन काही पाऊले उचलणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) सदर तपशिल उलपब्ध नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अमृतांजन पुलाखाली सन २०१२, २०१३ व २०१४ मध्ये अनुक्रमे सहा, दहा व सात अपघात झालेले आहेत.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर महामार्ग पोलीसांची ४ मदत केंद्रे, पळस्पे, बोरघाट, खंडाळा व वडगाव या ठिकाणी आहेत. या मदत केंद्रातील एकूण ७ अधिकारी व ७० कर्मचारी कार्यरत आहेत. याशिवाय पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या आस्थापनेवर २ अधिकारी व ३ कर्मचारी आणि पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रामीण) यांच्या आस्थापनेवरील १ पोलीस अधिकारी व १५ कर्मचारी महामार्गावर गस्तीकरीता नेमण्यात आलेले आहेत.

(२) व (३) सदर महामार्गावर जड-अवजड वाहनांनी डाव्या मार्गिकेमधून जाण्याबाबत अधिसूचना असतानादेखील उजव्या मार्गिकेमधून जाणा-या जड- अवजड वाहनांवर महामार्ग पोलीसांकडून तसेच जिल्हा पोलीसांकडून लेन कटींगची कारवाई करण्यात येते. महामार्ग पोलीसांकडून मागील दोन वर्षामध्ये लेन कॅटींगच्या एकूण १५,२२० केसेस करु. रु. १५,२३,३०६/- दंड वसूल केला आहे. तसेच, जिल्हा पोलीस, पुणे यांनी ३७६ केसेस करुन रु. ३७,३००/- एवढा दंड वसूल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित (पी.एम.पी.एम.एल ) ला आर्थिक दृष्ट्या अधिक सक्षम करणेबाबत

**(५१) * ३४०४ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित (पी.एम.पी.एम.एल) कडे असलेल्या एकूण २१०६ बसेस पैकी ६७९ बसेस बंद अवस्थेत असून या बसेस सुरू करण्यासाठी तांत्रिक कामगारांची कमतरता, स्पेअर पार्टसची उपलब्धता नसणे, पुरेसा निधी योग्य वेळेत उपलब्ध न होणे यामुळे अपेक्षित उद्दिष्टांप्रमाणे यातील बसेस सुरु न झाल्याने पी.एम.पी.एम.एल चे ५३ अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन रोखले गेले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन पुण्यातील पी.एम.पी.एम.एल हा विभाग अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,

(३) तसेच,पुणे महानगरपालिकेने पी.एम.पी.एम.एल करिता २९० बसेसची खरेदी करण्यासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात २० कोटी रुपये ची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर २० कोटी रुपये तरतुदी पैकी ११ कोटी रुपयेच महापालिकेने दिल्यामुळे बस खरेदी रखडली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) उपरोक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) परिवहन महामंडळाच्या १४३० व भाडेतत्वावरील ठेकेदाराकडील ६७३ अशा एकूण २१०३ बसेस संचलनात आहेत. महामंडळाच्या १४३० बसेस पैकी जानेवारी, २०१५ साधारणत: ६०० ते ६५० बसेस दुरुस्ती अभावी बंद होत्या ही वस्तुस्थिती आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून प्राप्त झालेला निधी, तसेच परिवहन महामंडळाच्या दैनंदिन उत्पन्नातुन बंद बसेसची देखभाल दुरुस्ती करण्यात आल्यामुळे जानेवारी २०१५ पासुन मार्गावरील बसेसच्या संख्येत वाढ झाली असून सद्य:स्थितीत परिवहन महामंडळाकडील बसेसपैकी ३७५ बसेस बंद अवस्थेत आहेत.

साधारणत: ६०० ते ६५० बसेस या देखभालदुरुस्ती अभावी बंद होत्या ही वस्तुस्थिती विचारात घेवून, प्राधान्याने देखभाल दुरुस्तीसाठी खर्च करुन बसेस संचलनास आणण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार परिवहन महामंडळाकडील ५३ अधिकाऱ्यांना माहे डिसेंबर, २०१४ व फेब्रुवारी, २०१५ चे वेतन माहे मार्च, २०१५ मध्ये अदा केले असून, माहे जानेवारी, २०१५ चे वेतन माहे एप्रिल, २०१५ मध्ये अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) परिवहन उपक्रमातील संचलन तुट (ऑपरेशन लॉस) संबंधीत महानगरपालिकांनी भरुन काढणे दिनांक १८.२.२०१४ च्या शासन निर्णयांन्वये महानगरपालिकांवर बंधनकारक करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात रुपये ७३ कोटी तर आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी रुपये ६३ कोटीची तरतुद प्रस्तावित केली आहे.

(३) पुणे महानगरपालिकेकडून जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजने अंतर्गत ३०० बसेससाठी सन २०१४-१५ मध्ये रुपये ३९.०७ कोटी इतकी तरतुद केलेली आहे.

(४) पुणे महापालिकेच्या स्वनिधीतील आगाऊ रुपये ९.३ कोटी पुणे परिवहन महामंडळास प्राप्त झाले असून, त्याअनुषंगाने जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या ३०० बसेस खरेदीसाठी पुणे परिवहन महामंडळाकडून कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत. प्राप्त रक्कम बस उत्पादक कंपन्यांना देण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई मधील लोकल रेल्वे मधून प्रवास करताना प्रवाशांवर होणाऱ्या हल्ल्याबाबत

**(५२) * ४०११ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील लोकल रेल्वे मधून प्रवास करताना मोबाईल चोरणे, चेन स्नेचिंग, महिला प्रवाशांवर झोपडपट्टीतून होणारे हल्ले, महिलाच्या हातावर हँगर मारून पर्स चोरणे, ह्या घटनामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, असे रेल्वे पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र सिंधल यांनी मान्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई मधील लोकल रेल्वे मधून प्रवास करताना मोबाईल चोरीबाबत सन २०१३ मध्ये दाखल १०४५ गुन्ह्यांपैकी ७१० गुन्हे तर सन २०१४ मध्ये दाखल १५१८ गुन्ह्यांपैकी ८६३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

चैन स्नॅचिंगबाबत सन २०१३ मध्ये दाखल ६२ गुन्ह्यांपैकी २७ गुन्हे तर सन २०१४ मध्ये दाखल ७३ गुन्ह्यांपैकी ३१ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

महिलांवर झोपडपट्टीतून होणा-या हल्ल्यांबाबत सन २०१३ मध्ये २ गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. तसेच २०१४ मध्ये ७ गुन्हे दाखल गुन्ह्यांपैकी १ गुन्हा उघडकीस आलेला आहे.

लोकलमधून प्रवास करणा-या महिलांच्या हातावर फटका मारुन पर्स चोरीबाबत सन २०१३ मध्ये दाखल ११ गुन्ह्यांपैकी ९ गुन्हे तर सन २०१४ मध्ये दाखल १२ गुन्ह्यांपैकी ५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.
(३) महिला प्रवाशांची सुरक्षा तसेच गुन्ह्यांना आळा बसण्याकरिता मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाकडून रात्रीच्या वेळी उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये महिलांच्या डब्यात मध्य परिमंडळात आणि पश्चिम परिमंडळात पोलीस कर्मचारी व होमगार्ड नेमले जातात.

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई कार्यालयात हेल्पलाईन कक्ष निर्माण करण्यात आला असून तेथे स्वतंत्र फोन देण्यात आला आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात व पोलीस उप आयुक्त कार्यालय, मध्य व पश्चिम परिमंडळ कार्यालयात महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे. सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिलांच्या तक्रारींची दखल तात्काळ घेण्याकामी महिला कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच महिला पोलीसांचे स्वतंत्र निर्भया पथक स्थापण्यात आले आहे.

तसेच मुंबई व उप नगरातील रेल्वे स्थानकांवर गुन्हे रोखण्याकामी १९९८ सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नवीन न्यायवैधक प्रयोगशाळा स्थापन करणेबाबत**

**(५३) * ३५३६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गुन्हा सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात आणि पोलीस आयुक्तांच्या नियंत्रणाखाली अशा एकूण ४५ न्यायवैद्यक प्रयोगशाळा निर्माण करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच त्याकरिता रक्कम रूपये ९ कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ४५ न्यायवैद्यक प्रयोगशाळा सुरू करण्यासाठी किती निधीची व मनुष्य बळाची आवश्यकता आहे,
(४) तसेच याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यामध्ये ४५ फिरती न्यायसहायक वैज्ञानिक सहायकता पथके स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील शिवडी येथे रुग्णालयातील टीबी रुग्णांची थुंकी नष्ट करण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(५४) * ४२०३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शिवडी येथे असलेल्या टीबी रुग्णालयातील टीबी रुग्णांची थुंकी थेट गटारात फेकण्यात येत असल्यामुळे परिसरातील रहिवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने लालबाग, परेल व शिवडी विभागात चिंतेचे व भितीचे वातावरण पसरले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील टीबी रुग्णाची थुंकी नष्ट करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) महासंचालक, आरोग्य सेवा, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी Airbome Infection Control in Healthcare and Other Setting या मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये निर्देशिल्याप्रमाणे क्षयरोगाच्या थुंकीचे निर्जतुकीकरण करण्यासाठी थुंकीच्या चाटीमध्ये निर्जतुक मिश्रण टाकण्यात आल्यानंतर काही वेळेनंतर त्याची विल्हेवाट लावण्यात येते. त्याप्रमाणे चाटींमध्ये ५% फिनॉल किंवा सोडीअम हायपोक्लोराईड १:२० या प्रमाणात टाकून देण्यात येते. रुग्ण त्या चाटीमध्ये थुकल्यांनतर सदर मिश्रणामुळे ती थुंकी निर्जतुक होते व त्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील 'नयना' प्रकल्पाकरिता शासनाने करावयाची निधीची तरतूद**

**(५५) * ५१७५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील 'नयना' प्रकल्पात पहिल्या टप्प्यातील २३ गावांच्या टाऊनशिपमध्ये देण्यात येणा-या पायाभूत सुविधांवर ७ हजार ३६२ कोटी रूपये खर्च करावा लागणार असून उपरोक्त प्रकल्पासाठी शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळणार नसल्याने उक्त निधी उभारणे सिडकोपुढे आव्हान ठरणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पनवेल तालुक्यातील २३ गावांमध्ये पायाभूत आणि सामाजिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अंदाजे ७,३६४ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चासाठी लागणारा निधी विकास केंद्रात येणा-या विकसित भूखंडांची विक्री, विकास शुल्क आणि ऑफ-साईट सिटी सर्विस डिलीव्हरी चार्ज यातून येणा-या उत्पन्नातून उभा केला जाणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २००७ मध्ये घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक पदभरती मध्ये झालेला गैरव्यवहार**

**(५६) * ४७८९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २००७ मध्ये घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक पदाच्या भरतीतील गैरव्यवहार प्रकरणी दिनांक २१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरतीमध्ये ८३ पैकी ३५ उमेदवारांची बोगस भरती झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. महानगर न्यायदंडाधिकारी, ३७ वे न्यायालय, मुंबई येथे सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ३७ वे न्यायालय, एस्प्लेनेड, मुंबई यांनी फौ.द.प्र.सं. कलम १५६ (३) अन्वये कार्यवाही करणेबाबत आदेशित केल्याने आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई एमईसीआर प्र. ०३ / १४ भा.द.वि कलम ४०३, ४१८, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४, १२० (ब), १०९, १९३, ५०६ सह ३४, ४०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) व (३) याबाबत तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेच्या अनेक भागात ठेकेदार नितीन वरघडे यांनी केलेली निकृष्ट कामे**

**(५७) * ३७०१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या बिबवेवाडी, धनकवडी, सहकार नगर आणि वानवडी कोंढवा या क्षेत्रिय कार्यालयांच्या हद्दीत ठेकेदार नितीन वरघडे याने कामे निकृष्ट प्रतीचे करुन गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार संबधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महापालिकेच्या बिबवेवाडी, धनकवडी, सहकार नगर आणि वानवडी कोंढावा या क्षेत्रिय कार्यालयांच्या हद्दीत ठेकेदार श्री. नितीन वरघडे यांनी केलेल्या कामाबाबत महानगरपालिकेच्या २१ जून, २०१४ च्या महासभेमध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेस अनुसरुन, उक्त ठेकेदार यांनी सन २०१३-१४ मध्ये केलेल्या एकूण १९३ पैकी ३० कामांची विशेष समिती स्थापन करुन तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये सदर कामे निकृष्ट प्रतीचे करुन गैरव्यवहार केल्याचे आढळून आले नाही, सदर ३० कामांपैकी १२ कामांमध्ये काही प्रमाणात अनियमितता आढळून आल्या, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका यांच्या अध्येक्षतेखाली गठीत केलेल्या तपासणी पथकामार्फत तपासणी केलेल्या १२ विकास कामांमध्ये अनियमितता आढळून आल्याने, महापालिकेने अधिक ४ तपासणी पथके गठीत करुन उक्त ठेकेदाराच्या सन २०१३-१४ मध्ये विविध विभागांतर्गत करण्यात आलेल्या उर्वरित १६३ विकास कामांची तपासणी चालू केली आहे.

तथपि, पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या कारवाई विरोधात संबंधित ठेकेदाराने मा. ५ वे सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन पुणे यांचे न्यायालयात स्पे.मु.नं.२९८/२०१५ अन्वये दाद मागतिली आहे.

(३) तपासणी मधील १२ विकास कामांमध्ये सर्वसाधारणपणे खालील अनियमितता आढळून आल्या आहेत-

अ) त्रयस्थ संत्रणेच्या प्रमाणपत्रासोबत नमुना अहवाल न जोडणे.

ब) कामामधील बचतवाढीस सक्षम अधिका-यांची मान्यता न घेणे.

क) कामामधील जागा बदलास सक्षम अधिका-यांची मान्यता न घेणे.

ड) कामामधील वर्गीकरणास सक्षम अधिका-यांची मान्यता न घेणे.

इ) महानगरपालिका मालकीचे नसलेल्या रस्त्यावर महासभेची मान्यता न घेता डांबरीकरण करणे.

ई) कामाशी निगडित बँक गॅरंटी, विमा. इ. कागदपत्रे ठेकेदाराने दिलेली नाहीत.

उ) डांबरी मालाच्या गाड्यांचे चलनावरील दिनांक, वेळ, गाडी नंबर इत्यादीमध्ये तफावत आढळून येणे.

उक्त अनियमिततेच्या अनुषंगाने सदर ठेकेदारावर व संबंधित अधिकारी/कर्मचा-यांवर पुणे महानगरपालिकेने खालील प्रमाणे कारवाई केली आहे :-

१. सदर ठेकेदारास सन २०१४-१५, ते २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निलंबित केले आहे.

२. सदर ठेकेदाराला दिनांक २२.८.२०१४ पर्यंत जे कार्यादेश दिले होते, ते सोडून निविदा प्रक्रीयेतील उर्वरित सर्व कामे रद्द केली आहेत.

३. सदर अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधीत ५ कनिष्ठ अभियंता व १ उप अभियंता यांची एक वेतन वाढ एका वर्षासाठी रोखण्यात आली आहे.

(४) वरील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

## पुणे येथे साखर संकुलाची केलेली तोडफोड

**(५८) * ३५७२ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास काही संघटनांच्या कार्यकर्त्यांनी पुणे येथील साखर संकुलाची तोडफोड करुन संकुलातील गाड्या पेटवून शासनाविरुध्द घोषणा दिल्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तोडफोडीत साखर संकुलाचे व गाड्यांचे किती नुकसान झाले,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, सदर प्रकरणी एक कार जाळण्यात आलेली असून साखर संकुल कार्यालयाच्या काचा, संगणक फोडण्यात आलेले आहेत. या प्रकरणी एकूण १० ते १२ लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे.

(३) सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुरक्र. ९ / १५ भादंवि कलम १४३, १४५, १४७, १४९, १५१, १५२, ३५३, ३३२, ३३६, ४३५, २२७ सार्वजनिक मालमत्ता नुकसान अधिनियम कलम ३ व ७, मुंबई पोलीस अॅक्ट ३७ (१) (३) सह प्रमाणे दिनांक १२.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी एकूण १४२ आंदोलनकर्त्यांना दिनांक १२.०१.२०१५ रोजी अटक करण्यात आलेली असून, त्यांना न्यायालयासमारे हजर केले असता, न्यायालयाने त्यांना जामिनावर सोडलेले आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या खार (पश्चिम) भागातील न्यु हनुमान नगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेचा विकास करण्याबाबत

**(५९) * ५२०५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खार (पश्चिम) भागातील न्यु हनुमान नगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेचा शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास करण्यासाठी मे.निमेश ग्लोबल सिंडीकेट या विकासकाबरोबर माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये वा त्यादरम्यान करारनामा झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रकल्प जोगेश्वरी, मुंबई येथील आनंदनगर, वाल्मीकी नगर एसआरए सोसायटी व न्यु हनुमान नगर एसआरए सोसायटी यांचे एकत्रीकरण करुन पूर्ण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यु हनुमान नगर एसआरए सोसायटींच्या सर्व झोपडपट्टी धारकांचे जोगेश्वरी येथे स्थलांतर करुन पुनर्वसन करण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत पाच वर्षात पुनर्वसन इमारतीचे कुठलेही काम झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बांधकामास विलंब होत असल्याने सोसायटीच्या सदस्यांनी विकासकाबरोबर झालेला करार रद्द करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर करार रद्द करुन सोसायटीच्या सभासदांना एसआरए योजनेअंतर्गत घरे मिळवून देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) मौजे बांद्रा, खार (पश्चिम) न.भू.क्र.१०८४ए(पै) या भूखंडावरील न्यु हनुमान नगर सहकारी गृहिनर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे पूर्वीचे विकासक मे.ॲश हाऊसिंग ॲण्ड कन्सल्टंट लि.यांनी सदरचा भूखंड सीआरझेड बाधित असल्याने पुनर्वसनाचे कोणतेही काम केले नव्हते. त्यामुळे न्यु हनुमान नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्व झोपडपट्टी धारकांनी दिनांक १३.१२.२००९ रोजी सर्वसाधारण सभा घेवून पुनर्वसनाच्या कामासाठी नवीन विकासक मे.निमेश ग्लोबल सिंडीकेट व डेव्हलपर्स यांची नियुक्ती केली.

न्यु हनुमान नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचा भूखंड सीआरझेड ने बाधित असल्याने नवीन नियुक्त विकासकाने जोगेश्वरी (पश्चिम) मौजे ओशीवरा न.भू.क्र.१(पै) येथे त्यांचेमार्फत चालू असलेल्या आनंद व वाल्मीकी एसआरए सहकारी गृहनिर्माण या दोन संस्थांच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसोबत न्यु हनुमान नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा एकत्रीकरणाचा प्रस्ताव विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या कलम ३३(१०) अंतर्गत उपकलम ७.८ अन्वये सादर केला. त्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २९.७.२०१० रोजी आशयपत्र दिले आहे. सदरहू एकत्रित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पुनर्वसन घटकाची 'अे' ते 'के' विंग असलेली इमारत प्रस्तावित असून इमारत बांधकामाचे सुधारित आराखडे दिनांक ४.१२.२०१० रोजी मंजूर करण्यात आले असून पुनर्वसन इमारतीच्या बांधकामास पूर्ण बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. पुनर्वसन इमारतीमधील ६४ सदनिकांसाठी अंशतः भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. अन्य दोन विंगचे जोत्यापर्यंतचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(५) व (६) पुनर्वसन इमारतीच्या बांधकामाबाबत प्राप्त तक्रारीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे दिनांक २६.११.२०१४ रोजी घेतलेल्या सुनावणीमध्ये पुनर्वसन इमारत बांधावयाच्या जागेवर १५ झोपडीधारक जागा रिक्त करीत नसल्यामुळे काम थांबल्याचे यावेळी निदर्शनास आले. सदर झोपडीधारकांविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३ व ३८ अन्वये निष्कासन करण्याच्या कार्यवाहीबाबत देण्यात आलेल्या सूचनेनुसार सक्षम प्राधिकारी, म्हाडा यांना दिनांक १७.१.२०१५ रोजी सहकारी गृहनिर्माण संस्थेस व विकासकास निष्कासित करावयाच्या झोपडीधारकांना संक्रमण गाळे उपलब्ध करुन देण्याचे कळविले आहे.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका पारगमन शुल्काची वसुली करुन वाहन चालकांची होत असलेली असलेली फसवणूक**

**(६०) * ५२७३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीतुन जाणाऱ्या महामार्गावर लावण्यात आलेल्या पारगमन वसुली (एस्कॉर्ट) नाक्यावर बनावट पावत्यांव्दारे पारगमन शुल्काची वसुली करुन वाहनधारकांची फसवणूक सुरु असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलबीटी अधीक्षक व संबंधितांनी पारगमन नाक्यावर छापा टाकून १० कर्मचाऱ्यांसह बनावट पावती पुस्तके, २० हजार रुपये रोख व वाहन असा ऐवज जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी पवारवाडी (मालेगांव, जि.नाशिक) पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही. मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील पारगमन शुल्क फी वसुलीचे कंत्राट मे.मेगा एंटरप्रायझेस यांना आणि दैनिक बाजार फी वसुलीचे कंत्राट मे.सिटी केअर डेव्हलपमेंट कॉर्परेशन यांना देण्यात आले होते. मात्र दिनांक ०१.०१.२०१५ रोजी पारगमन शुल्क वसुलीचा हायवे नाका येथे पारगमन वसुली ठेकेदाराकडून पारगमन शुल्क रुपये २००/- व्यतिरिक्त अन्य दैनिक बाजार जागा फी रुपये ५०/- याचीही वसुली करण्यात येते असल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे.

(२) दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी मालेगाव महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी पारगमन शुल्क वसुलीच्या हायवे नाका येथे भेट दिली असता, त्या ठिकाणी आढळून आलेल्या रुपये ५०/- च्या दैनिक बाजार वसुलीच्या बुक नंबर नसलेल्या, एकूण २४४ इतक्या पावत्या, रुपये २०,०००/- रोख व वाहन जप्त करुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

(३) व (४) दिनांक १४.०१.२०१४ ते ३१.०१.२०१५ या कालावधीसाठी मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील बाजार जागा फी वसुलीचे कंत्राट मे.सिटी केअर डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांना देण्यात आले होते. सदर करारनाम्यानुसार सार्वजनिक जागा व बाजारातील जागेवर तात्पुरता व्यवसाय करणाऱ्यांकडून तसेच महानगरपालिका क्षेत्रात माल उतरविण्यात आल्यास, उक्त कंत्राटदाराने बाजार जागा फी वसुली करणे अपेक्षित होते.

तथापि, दिनांक ०१.०१.२०१५ रोजी मे.सिटी केअर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्याऐवजी मे.मेगा एंटरप्रायझेस, यांच्याकडून बाजार शुल्क वसुलीचे काम करण्यात आल्याचे महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या चौकशीत निष्पन्न झाले.

अशी वसुली करणाऱ्या कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांविरुध्द पवारवाडी पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक १/२०१५, दिनांक ०१.०१.२०१५ अन्वये नोंदविण्यात आला आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या जेष्ठ नागरीक धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(६१) * ३६३६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने जेष्ठ नागरीकांसाठी माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान जेष्ठ नागरीकांचा आधार बनण्यासाठी धोरण जाहिर केले मात्र त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष समिती कक्ष महापौरांनी स्थापन केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीमार्फत ज्येष्ठ नागरीकांसाठी कोणत्या योजना सुचविण्यात आल्या,

(४) असल्यास, त्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. जेष्ठ नागरिक धोरणांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विरंगुळा केंद्र, जेष्ठ नागरिक दिन, महानगरपालिकेच्या शाळेमधील एक खोली दर रविवारी बैठकीसाठी नि:शुल्क उपलब्ध करुन देणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी ५० टक्के दराने वैद्यकीय सुविधा, उद्यानांमध्ये स्वतंत्र आसन व्यवस्था अशा अनेक घटकांची अंमलबजावणी झाली आहे.

(२) ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष समिती गठित करण्यात आली आहे.

(३) सदर समितीमार्फत धोरणाची अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेणे अपेक्षित असून त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला व आगामी काळासाठी सूचना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शवविच्छेदन कक्ष वापराविना पडून असल्याबाबत**

**(६२) * २७२४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषदेच्या डॉ.बी.जी.छाया रूग्णालयामध्ये शवविच्छेदन कक्षाची सोय व्हावी म्हणून रूग्णालयाच्या मागील मोकळ्या जागेत शवविच्छेदन कक्ष उभारण्यात आला असून, या शवविच्छेदन कक्षाचा लोकार्पण सोहळा होऊन सात महिन्यांचा कालावधी लोटला असतानाही हा शवविच्छेदन कक्ष अद्याप कार्यान्वित झाला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शवविच्छेदन कक्ष कार्यान्वित न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदर शवविच्छेदन कक्ष विनाविलंब कार्यान्वित होण्यासाठी शासनाने कोणती ठोस कारवाई केली ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

अंबरनाथ (जि.ठाणे) नगरपरिषदेच्या डॉ.बी.जी.छाया रुग्णालयामध्ये शविवच्छेदन कक्षाची सोय व्हावी म्हणून रुग्णालयाच्या मागील मोकळ्या जागेत शवविच्छेदन कक्ष सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर यांचेकडून स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधीतून उभारण्यात आलेला आहे.

(२) तथापि, या कक्षामध्ये शवविच्छेदन या कामासाठी लागणा-या अत्यावश्यक सोयी सुविधा व पुरेसे वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे सद्यःस्थितीमध्ये शवविच्छेदन कक्ष ताब्यात घेण्यात आलेला नसल्याने सदर कक्ष कार्यान्वित नाही अशी वस्तुस्थिती आहे.

(३) सदर शवविच्छेदन कक्ष विनाविलंब कार्यन्वित करण्यासाठी लागणा-या सोयी सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १६.०२.२०१५ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविले आहे. त्याचप्रमाणे याकरिता नगरपालिकेसाठी आवश्यक तेवढा तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिनांक ११.०२.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त दोन्ही बाबींची पूर्तता होताच सदर शविवच्छेदन कक्ष तातडीने सुरू करण्यात येईल.

-----------------

**नागपूर येथील धरमपेठ या ठिकाणी शरीरसौष्ठवपटूची झालेली हत्या**

**(६३) * ३८४५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील धरमपेठ या ठिकाणी माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या सप्ताहात वा त्यादरम्यान एका शरीरसौष्ठवपटूची हत्त्या झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर शहरातील हिंगणा टी पॉईट, तुकडोजी चौक, जगनाडे चौक, महाराज बाग, फ्रेंडस कॉलनी, इमामवाडा, अंबाझरी तलाव, फुटाळा तलाव आदि भागात असलेल्या हात ठेल्यावर मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढलेली असताना पोलीसांचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(६) तसेच नागपूर शहरातील रहिवाश्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नागपूर शहरात सन २०१५ या वर्षात व सन २०१४ अखेर किती हत्या झाल्या आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन अंबाझरी येथे अप.क्रमांक १३/२०१५, भा.दं.वि.कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे व गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गस्त पथकांची वाढ करण्यात आली आहे.या मोहिमेमध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिकारी देखील गस्त घालतात व त्या दरम्यान हजर असलेल्या कर्मचाऱ्यांना देखील वेळोवेळी निर्देश देण्यात येतात. याबाबत पोलीस आयुक्त आणि पोलीस सह आयुक्त दररोज आढावा घेत आहेत.

एप्रिल २०१४ पासून गुन्हेशाखेच्या नियंत्रणात ४० कर्मचाऱ्यांचे विशेष पथक, शस्त्र, वॉकी-टॉकी, मोटार सायकलसह दिवस-रात्र दोन पाळीत गस्त लावण्यात आली आहे. सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हेशाखा नागपूर शहर येथुन दररोज ३ जिप गाडया ज्यामध्ये पोलीसांची (महिला पोलीससह) गस्त लावण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त हे महत्त्वाचे वेळी स्वत: गस्तीवरील पोलीस कर्मचाऱ्यांची पाहणी करतात. तसेच नव्याने २३ पोलीस वाहने (पोलीस गस्तीपथक) लोकसदृश अशा महत्त्वाचे ठिकाणी नेमण्यात येऊन त्यांस नजिकचे संवेदनशील ठिकाणी गस्तीकरिता पाठविण्यात येते.

(७) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस स्टेशन हद्दीत सन २०१४ वर्षात खुन या सदराखाली एकुण १०३ गुन्हे दाखल झाले, त्यामध्ये १०६ जणांची हत्या झाली आहे. १०३ गुन्ह्यांपैकी ९३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

तसेच फेब्रुवारी २०१५ अखेरपर्यंत १३ गुन्हे दाखल झाले त्यामध्ये १३ जणांची हत्या झाली आहे. १३ गुन्ह्यांपैकी ११ गुन्हे उघडकीस आहे आहेत.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील कर्मचा-यांची रिक्त असलेली पदे**

**(६४) * २९८७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येला मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करण्यासाठी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने कोट्यवधी रुपये खर्चून ८१ जलकुंभ उभारले आहेत परंतू पाणीपुरवठा विभागात काम करण्यासाठी अपुरे कर्मचारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा विभागात २४३ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा विभागात आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदांकरीता मंजूर करण्यात असलेल्या आस्थापना सूचीनुसार पालिकेच्या पाणी पुरवठा विभागासाठी महानगरपालिकेकडून कर्मचा-यांची भरती करण्यात आली आहे.

या विभागाकरीता आवश्यक असलेल्या अतिरिक्त कर्मचारीवृंदाची गरज महानगरपालिकेकडून विहित निविदा प्रक्रिया अवलंबून खाजगी अभिकरणाच्या माध्यमातून भागविण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेच्या इतर भागातून पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यकतेनुसार बदलीने कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

महानगरपालिकेकडून उभारण्यात आलेले ८१ जलकुंभ व्यवस्थितिरित्या कार्यान्वीत असून वर उल्लेख केल्यानुसार महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा विभगाकरीता आवश्यक कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देण्यात आला असून पालिका क्षेत्रात सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महापालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांच्या पी.एफ. मुदत ठेवीमध्ये लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(६५) * ३५०५ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांच्या पी.एफ. मुदत ठेवीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे तसेच त्यासंबंधीचे रेकॉर्ड गायब असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी केली असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, महालेखाकार, मुंबई यांचे सन १९९३-९४ ते सन १९९६-९७ चे शिक्षण मंडळाचे चाचणी लेखापरीक्षण अहवालात भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूक रक्कमेत रक्कम रुपये २.७१ कोटीची अपहार झाल्याचे साशंकता व्यक्त करुन सदर तफावत भविष्य निर्वाह निधीवरील देय होणारी रक्कम व गुंतवणूकीवरील प्राप्त होणाऱ्या व्याजामध्ये असण्याची शक्यता वर्तविली आहे.

यासंदर्भात चौकशी करण्याकामी तत्कालीन शिक्षण मंडळाने दिनांक १३.०८.२००४ रोजी सनदी लेखापाल यांची नियुक्ती केली आहे. मात्र यासंबंधिचे कोणतेही रेकॉर्ड गायब झालेले नाही.

(२) उपरोक्त - १ मध्ये नमुद प्रमाणे शिक्षण मंडळाने महालेखाकार, मुंबई यांचे लेखापरीक्षण अहवालातील त्रुटी व वस्तुस्थिती समोर आणणेकरिता दिनांक १३.०८.२००४ रोजीच्या नियुक्त केलेल्या सनदी लेखापालाच्या अहवालानुसार शिक्षण मंडळातील शिक्षकांचा पी.एफ.मुदत ठेवीमध्ये गैरव्यवहार झालेला नसून संबंधित कर्मचारी यांनी मुदतठेवी नोंदीत आणल्या नाहीत परिणामी अशा नोंदी गहाळ झाल्यासारख्या दिसल्या आता अशा मुदत ठेवींची नोंद, नोंदवहीत घेण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेने डास निर्मुलन प्रभावी औषध कमी प्रमाणात वापरण्यात आल्याबाबत

**(६६) * ३००९ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात डास निर्मुलन मोहिमेसाठी केवळ दिड कोटीची तरतूद केली असून डास निर्मुलन प्रभावी औषध कमी प्रमाणात वापरण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किटकनाशक फवारणीच्या कामाकरिता पालिकेचे २४९ पैकी १२५ कर्मचारी कार्यरत असल्याने या मोहिमेचा अयशस्वी ठरत असल्याचा आरोप महानगरपालिका सदस्यांनी केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाब कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, कारवाईचा तपशील काय आहे,

(५) अद्याप, मिरा-भाईंदर शहरातील डास निर्मुलन मोहिम प्रभावी करण्यासाठी कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) होय,

किटक नाशक फवारणीच्या कामाकरिता महानगरपालिकेच्या २४९ कर्मचाऱ्यांपैकी १२५ कर्मचारी कार्यरत असून उर्वरीत १२४ कामगारांकडून साफसफाईची कामे करुन घेतली जात आहेत.

(३) सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात मिरा-भाईंदर महानगरपालिकेने डास निर्मुलन मोहिमेसाठी रु. १.५० कोटी इतक्या रकमेची तरतूद केली आहे. मात्र सदर तरतूद अपुरी पडत असल्याने रु. ८९,४०,७००/- इतकी अतिरिक्त तरतूद पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध केली आहे. त्यानुसार मंजूर दरात डास नाशके, अळी नाशके खरेदी करुन शहरामध्ये फवारणीची कामे करण्यात येत असून बहुउद्देशिय आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत डास उत्पत्तीवर चांगल्या प्रकारे नियंत्रण आणण्यात आले आहे.

(४) व (५) डासजन्य आजाराच्या फैलावास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून खाडीलगत दलदलीच्या ठिकाणचे ओपन प्लॉट, मोठे नाले या ठिकाणी डास अळीनाशकाची टेंम्पोद्वारे फवारणी करणे, आरोग्य सेवकांमार्फत घरोघरी जाऊन पाणी साठयांची तपासणी करुन डास अळी आढळलेले पाणी साठे रिकामे करणे व त्यामध्ये टॅमीफॉस टाकणे, घरे, इमारती, चाळी, झोपडपट्टयांच्या आवारातील डास उत्पत्ती स्थाने नष्ट करणे, ज्या ठिकाणी डास पैदास आढळून आल्या, अशा बांधकाम विकासकांना नोटीस देणे, तसेच घर, दुकानात व इतर आस्थापना येथे डेंगू डासांच्या अळया आढळून आल्यास संबंधितांवर महानगरपालिकेकडून गुन्हे दाखल करण्याच्या कारवाईबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.

याखेरीज महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नोटीस बोर्डवर माहिती पत्रके लावणे, केबल, दैनिक वृत्तपत्र, पथनाटय इत्यादींच्या माध्यमातून डासजन्य आजाराविषयी जनजागृती करणे, नगरसेवकांसाठी कार्यशाळा आयोजित करणे इत्यादी उपाययोजना महानगरपालिकेतर्फे करण्यात आल्या आहेत.

शहरातील डास निर्मुलन मोहिम प्रभावी करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात एकात्मिक डास नियंत्रणासाठी रु. ४.०० कोटी इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित केली आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयात वेस्टर्न कोलफिल्डस् लिमिटेड कंपनी कोळसा खाणी सुरु करणार असल्याबाबत

**(६७) * ३९८१ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात येत्या काही वर्षात वेस्टर्न कोलफिल्डस् लिमिटेडच्या नवीन दहा कोळसा खाणी सुरु करण्यात येणार असून अगोदरच जिल्हयात अत्याधिक प्रदुषण असताना या खाणीना सुरुवात झाल्यास तेथील नागरिकांचे जीवन अत्यंत कठिण होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियोजित खाणीमुळे बेरोजगारांना रोजगार मिळेल परंतू प्रदुषण वाढेल हे पाहता दोन्ही गोष्टींचा समन्वय साधून शासन कोणता उचित निर्णय घेणार आहे वा घेत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेडने कळविल्यानुसार त्यांच्या अस्तित्वात असलेल्या कोळसा खाणींचे विस्तारीकरण, भूमिगत खाणींचे उघडया खाणीमध्ये रुपांतरण, अस्तित्वात असलेल्या खाणीत बदल अशा स्वरुपाचा कार्यक्रम प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे ५ खाणींचे प्रस्ताव वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेडकडून प्राप्त झाले असून त्यामध्ये ३ नवीन व २ रुपांतर खाणींचा समावेश असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांनी कळविले आहे.

(२) व (३) सदर प्रकल्प सुरु झाल्याने रोजगार निर्मिती होणार असून पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल असे वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेडने कळविले आहे.

-----------------

**चंद्रपूर महाऑनलाईन या खाजगी कंपनीकडून शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याबाबत**

**(६८) * ५१४३ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऑनलाईन या खाजगी कंपनीकडून शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी वित्त समितीमार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वित्त समितीने महाऑनलाईन या खाजगी कंपनीला जुलै, २०१४ पासून मोबदला अदा करु नये असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच दिलेल्या निधीची पडताळणी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात यावी अशी मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरात आणि उपनगरात सर्वसामान्यांना स्वस्त घरांची योजना राबविण्याबाबत**

**(६९) * ३३५५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात आणि उपनगरात सर्वसामान्यांना घर घेणे आवाक्याबाहेर गेले असल्याने राज्य शासनाने मध्यवर्गीयांना परवडणारे अफॉर्डेबल हाऊसिंग स्कीम च्या माध्यमातून ११ लाख घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने उक्त प्रश्नांबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, केलेल्या अंमलबजावणीचा तपशील काय,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच अंमलबजावणी झाली नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) राज्याच्या प्रस्तावित नवीन गृहानिर्माण धोरणानुसार विविध प्राधिकरणाच्या माध्यमातून येत्या ४ वर्षात मुंबईमध्ये ११ लक्ष घरकुले निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे.

(२), (३) व (४) राज्याचे सुधारित प्रस्तावित गृहनिर्माण धोरण अद्याप विचाराधीन आहे. गृहनिर्माण धोरण अंतिम झाल्यावर अंमलबजावणी करण्यात येईल.

-----------------

**मुंबईतील पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) भागात पोलिसांच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे अवैध धंदे सुरू असल्याबाबत**

**(७०) * ६१३७ श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) येथे जोगेश्वरी व वनराई पोलीस स्थानकाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे बांद्रेकरवाडी, रामनगर, इंदिरानगर झोपडपट्टी, रेल्वे कॉलनी येथे गावठी दारुची सर्रास विक्री तसेच ठाकूरनगर नाका (मजासवाडी) येथे मटका,जुगार यासारखे अवैध धंदे चालत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील नागरिकांनी पोलीस स्थानकाच्या १०० या दूरध्वनी क्रमांकावर तसेच लेखी तक्रारी करुन सुध्दा कोणतीही कारवाई केली जात नाही, उलट तक्रार दाखल करणाऱ्यास उक्त पोलीस स्थानकातील अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून दमदाटी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांवर तसेच उक्त ठिकाणावरील अवैध धंदे बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील परिमंडळ- १० अंतर्गत जोगेश्वरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका, जुगार यासारखे अवैध धंदे असल्याचे आढळून आले नाही. तथापि, नवलकवाडी, आर के सिंग मार्ग आंबेवाडी येथे जुगाराच्या अवैध धंद्याबाबत माहिती प्राप्त झाल्यावरुन त्याविरुध्द ताबडतोब कारवाई करण्यात आलेली आहे.

सन २०१४ मध्ये मेघवाडी पोलीस ठाणे यांनी अवैध जुगाराबाबत दाखल २ गुन्ह्यात २५ आरोपींना अटक केले आहे. तसेच जोगेश्वरी पोलीस ठाणे यांनी दाखल ५ गुन्ह्यात ३६ आरोपींना अटक केली आहे.

परिमंडळ - १२ अंतर्गत बांद्रेकरवाडी, रामनगर या ठिकाणी गावठी दारु विक्री, जुगार, मटका यासारखे अवैध धंदे आढळून आलेले नाहीत.

वनराई पोलीस ठाणे यांनी सन २०१४ मध्ये अवैध दारु धंद्याबाबत दाखल २५ गुन्ह्यामध्ये १६ आरोपींना अटक केली आहे. तसेच अवैध जुगाराच्या दाखल ९ गुन्ह्यात २२ आरोपींना अटक केली आहे.

(२) १०० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करणा-या कोणालाही दमदाटी केलेली नाही. नागरिकांनी तक्रार केल्यास त्याची तात्काळ दखल घेवून शहानिशा केली जाते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई येथील प्रस्तावित विमानतळाच्या कामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७१) * ४२२५ श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रस्तावित विमानतळाचे काम केंद्र शासनाच्या सहकार्याने सुरू असुन या विमानतळाचा सन २०१९ पर्यंत वापर सुरू करण्याचे नियोजन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी कोणकोणत्या बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) उक्त विमानतळासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे किती कालावधीत उपलब्ध करण्यात येणार आहे व प्रत्यक्षात बांधकाम साधारण केव्हा सुरू करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) वन विषयक मंजूरीचा दुसरा टप्पा प्रक्रियाधिन असून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

विमानतळ प्रकल्पग्रस्तांना मोबदला म्हणून विकसित भूखंड देण्याकरीता उभारण्यात येत असलेल्या पुष्पक नगरच्या विकासाकरीता पर्यावरणविषयक मंजूरी, त्याचप्रमाणे वडघर, पुनर्वसन आणि पुनःस्थापना क्षेत्राकरीता किनारपट्टी नियंत्रण क्षेत्रविषयक (सीआरझेड) मंजूरी पर्यावरण व वन मंत्रालयाकडून प्रलंबित आहे.

भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनःस्थापना आणि सरकारी खाजगी भागीदारी तत्वावर विकासकांची निवड करण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) चार टप्प्यामध्ये विस्तारलेल्या विमानतळ प्रकल्पाचे मुलभूत अंदाजे रु. १५, १४९ कोटी एवढे आहे. सदरचा सर्व प्रकल्प खर्च सरकारी खाजगी भागीद्वारे विकासकाकडून करण्यात येईल. भूविकास आणि उच्च अतिदाबाच्या पारेषणमार्गाच्या हस्तांतरण शुल्कासह पुर्व विकसित कामाचा खर्च सिडकोकडून करण्यात येणार येईल. सिडकोद्वारे करण्यात येणा-या पुर्वविकास कामांचा खर्च बिनव्याजी कर्ज म्हणून विकासकावर लादण्यात येणार आहे. तसेच, विकासकाकडून प्रकल्पाच्या प्रत्यक्ष उभारणीस जुलै, २०१६ पर्यंत प्रारंभ अपेक्षित आहे.

-----------------

**करमाळा (जि.सोलापूर) शहरात वीरशैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीकरिता जागा देण्याबाबत**

**(७२) * ४२७९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) शहरात मराठा, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन या समाजबांधवाना स्वतंत्र स्मशानभूमी असून वीरशैव लिंगायत समाजास स्मशानभूमीच नसल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानूरकर मठाने त्यांना अंत्यसंस्कार करु न दिल्यास त्यांचा अंत्यविधीचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी सातनळ विहीर परिसरात ५ एकरची जागा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेत पाच वर्षापूर्वी ठराव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीरशैव लिंगायत समाजासाठी स्मशानाभूमीकरीता जागा देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**मुंबई महापालिकेने पाणी बिल थकविणाऱ्या खाजगी व सरकारी थकबाकीदारांची नावे जाहीर केल्याबाबत**

**(७३) * ४५२२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने पाणी बिलाची रक्कम थकविणाऱ्या थकबाकीदारांना सूट देण्यासाठी अभय योजना सुरु केली होती,हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत किती थकबाकीदारांना किती रकमेची सूट देण्यात आली तसेच त्यामुळे किती थकबाकी वसूल करण्यात आली,

(३) अद्यापही, खाजगी व सरकारी थकबाकीदारांकडे किती थकबाकी वसूल होण्याची शिल्लक आहे,

(४) थकबाकी वसूलीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाणी बिलाच्या थकबाकीचा मोठ्या प्रमाणावर भरणा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त आकाराची (दंड) रक्कम माफ करणारी अभय योजना दिनांक १६.०६.२०१४ ते दिनांक २१.११.२०१४ या काळात राबविली होती.

(२) अभय योजने अंतर्गत ८६,८१५ जलदेयक ग्राहकांनी अभय योजनेचा फायदा घेतला. अभय योजनेच्या काळात रु. २३४.८७ कोटी रकमेच्या जलदेयकांची वसूली झाली. त्यापैकी रु. १६४.५५ कोटी एवढ्या रकमेचा भरणा करण्यात आला असून रुपये ७०.३२ कोटी एवढ्या रकमेचा अतिरिक्त आकार माफ करण्यात आला आहे.

(३) दिनांक २८.०२.२०१५ रोजी दंडाच्या रकमेसह खाजगी थकबाकीदारांकडे रु. ७०४.१८ कोटी व सरकारी थकबाकीदारांकडे रु. ४३८.४५ कोटी इतकी थकबाकी आहे.
(४) सर्व थकबाकीदारांना जलदेकामध्येच बिलाचा भरणा विहीत कालावधीत करण्यासंबंधी सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिल्या जातात. त्यानुसार पुर्तता न झाल्यास महानगरपालिकेमार्फत जलजोडण्या खंडीत केल्या जातात. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व थकबाकीदारांना जलदेयकाची रक्कम लवकरात लवकर अदा करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विनंतीपत्रे पाठविण्यात आली आहेत.

-----------------

**वसई (जि.पालघर) तालुक्यात पालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयात शवविच्छेदनाची व्यवस्था नसल्याबाबत**

**(७४) * ४६३४ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात पालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयात शवविच्छेदनाची व्यवस्था नसल्यामुळे स्थानिक नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने उक्त पालिका रुग्णालयात शवविच्छेदनाची व्यवस्था तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सद्यःस्थितीत सदर ठिकाणी शवविच्छेदनाची व्यवस्था नाही हे खरे आहे. सदर ठिकाणचे शवविच्छेदनगृह जीर्ण झाल्यामुळे सन २००७ पासून या ठिकाणी शवविच्छेदन केले जात नाही. परंतु लगतच्या पाचुबंदर या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शवविच्छेदनाची व्यवस्था उपलब्ध असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होते अशी वस्तुस्थिती नाही.
(२) व (३) याबाबत महानगरपालिकेमार्फत सर डी.एम.पेटीट रुग्णालयाअंतर्गत पाचबुंदर येथे स्मशानभूमी लगतच्या जागेवर निविदा प्रक्रिया राबवून नव्याने शवविच्छेदनगृह व्यवस्था बांधण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील जुन्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत**

**(७५) * ४६६८ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील जुन्या इमारतीचा समुह विकास (क्लस्टर डेव्हलपमेंट) करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या योजनेची सुरुवात केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(९) अंतर्गत जुन्या तरतूदीनुसार मुंबई बेट शहरामध्ये नागरी नूतनीकरण योजनेसाठी किमान ४००० चौ.मी. क्षेत्र असलेल्या व रस्ते, नाला वगैरे भौतिक हद्दीने विहीत झालेल्या भूखंडामध्ये प्रामुख्याने उपकर इमारतीच्या पुनर्विकासासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अथवा भाडेकरुंच्या पुनर्वसनासाठी आवश्यक चटई क्षेत्र निर्देशांक अधिक विनियमाचे तरतूदीनुसार प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक यामधील कमाल चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

विनियम ३३(९) मध्ये योजनेची जलदगतीने अंमलबजावणी होणेसाठी चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेमध्ये वाढ न करता प्रस्तावित सुधारणासंदर्भाने शासनाने दिनांक २७.१२.२०१३ च्या सूचनेन्वये नागरिकांच्या सूचना/हरकती मागविलेल्या होत्या. शासनाने सदर सुधारणा मुंबई बेट शहराबरोबर आवश्यक फेरफारासह मुंबई उपनगर क्षेत्रासाठीही प्रस्तावित केलेल्या होत्या. प्राप्त सूचना/हरकतदारांना सुनावणी देवून व इतर सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन, मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.६१/२०१४ मध्ये दिलेले अंतरिम आदेश विचारात घेवून शासनाने दिनांक ९.९.२०१४ च्या अधिसूचनेन्वये फक्त मुंबई बेट शहरासाठी सुधारणा मंजूर केलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबई बेट शहरामधील सर्व प्रकारच्या ३० वर्षाच्या जुन्या इमारती धोकादायक /मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत तरतूद करणेत आलेली आहे.

(३) शासनाकडील विनियम ३३(९) मध्ये सुधारणा मंजूर केलेली अधिसूचना दिनांक ९.९.२०१४ रोजी शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध झालेली असल्याने त्या दिनांकापासून ती अंमलात आलेली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.६१/२०१४ मध्ये दिलेले अंतरिम आदेश विचारात घेता विनियम ३३(९) च्या सुधारित तरतूदीनुसार अनुज्ञेय होणारा चटई क्षेत्र निर्देशांक हा जुन्या तदतूदीनुसार परिगणित होणा-या चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त असल्यास प्रस्तुत जनहित याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश देईपर्यंत तो अनुज्ञेय रहाणार नाही अशी अट दिनांक ९.९.२०१४ रोजीच्या अधिसूचनेमध्ये घालणेत आलेली आहे.

-----------------

## मुंबई शहरातील पवई येथील २३० एकर जमीन संपादित करुन बांधकाम विकासकाने केलेला गैरव्यवहार

**(७६) * ५५४४ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील पवई येथील २३० एकर जमीन मूळ मालकांकडून संपादित करुन गरीब व मध्यमवर्गीयांसाठी घरे बांधण्यासाठी शासनाने एमएमआरडीए च्या माध्यमातून हिरानंदानी या विकासकास दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी झालेल्या त्रिपक्षीय करारानुसार या जमिनीवर फक्त २३० चौ.फूट (४० चौ.मी.) आणि ८६१ चौ.फूट (८० चौ.मी.) याच आकाराची घरे बांधणे आणि त्यापैकी १५ टक्के घरे शासनाला १३५ रुपये प्रति चौ.फूट या दराने राज्य शासनाला देणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विकासकाने यासर्व बाबींचे उल्लंघन करुन गरीबांसाठी घरे बांधली नसून शासनालाही घरे दिली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी उपरोक्त विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात सुरू असलेल्या जनहित याचिका क्रमांक १३१/२००८, ९१/२००८ व २१/२०१० यांचिकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.२२/०२/२०१४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाप्रमाणे उर्वरित विकसनातून ४० चौ.मी. च्या १५११ सदनिका व ८० चौ.मी. च्या १५९३ सदनिका विकसित करावयाच्या आहेत. तसेच, एकूण चटईक्षेत्र निर्देशांकाच्या १५ % क्षेत्राच्या सदनिका राज्य शासनाच्या रु.१३५/- प्रति चौ.फुट या दराने द्यावयाच्या आहेत. शासनाच्या दिनांक ४/१२/२००९ रोजीच्या आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विकासकास रु.८६.७५ कोटी उल्लंघन झालेल्या क्षेत्रासाठी दंड म्हणून भरणेस कळवले होते. परंतू सदर प्रकरणी शासनाने नियुक्त केलेल्या लवादाने दि.१६/०४/२०११ रोजी निर्णय दिला असून या निर्णयानुसार विकासकाने जमा केलेले अग्रिम रु.३ कोटी परत न करता इतर सर्वर दंडाची रक्कम माफ करण्याचा निर्णय दिला आहे. मात्र या निर्णया विरोधात प्राधिकरणाने व शासनाने एकत्रितरित्या दि.१४/११/२०११ रोजी मा.उच्च न्यायालयात दावा केला आहे.

-----------------

### ठाणे जिल्ह्यातील दिवा रेल्वे स्थानकात प्रवाशांनी केलेले आंदोलन

**(७७) * ५७६६ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवा रेल्वे स्थानकात दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास रेल रोको आंदोलनात दंगलखोर प्रवाशांनी रेल्वेच्या संपत्तीचे मोठया प्रमाणात नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० हजारांहून अधिक प्रवाशांच्या जमावासमोर पोलिसांची संख्या मात्र कमी असल्याचे सदर घटनेमुळे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवा गावची लोकसंख्या पाच लाखांपेक्षा अधिक असूनही याठिकाणी पोलीस ठाणे नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, दिवा येथे नवीन पोलीस ठाणे स्थापन करणेबाबत व उक्त रेल्वे स्थानकात पोलिसांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिवा रेल्वे स्टेशन येथील १० ते ११ हजाराच्या बेकायदा जमावाकरवी नासधुस सुरु झाल्यावर रेल्वे पोलीस, रेलवे सुरक्षा बल व ठाणे शहर पोलीस असे एकूण १८५ सुरक्षा अधिकारी व कर्मचारी तसेच राज्य राखीव पोलीस बल यांची तुकडी हजर होती. या सुरक्षा दलाकडून जास्तीत जास्त अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी हजर होते.

(३) होय. तथापि, मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा आऊट पोस्ट कार्यरत आहे.

(४) सदर घटनेबाबत मुंब्रा शहर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ७/२०१५ भारतीय दंडविधान संहिता कलम ३३२, ३३३, ३३६, ३३७, ३५३, ४२७, १४९, १४३, १४४, १४५, १४७, १४८ सह सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान कलम ३, ४ सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ सह मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१) (३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये २० दंगलखोरांना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(५) नियोजित दिवा विभागात मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा आऊट पोस्ट आहे. दिवा येथे नविन पोलीस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. दिवा रेल्वे स्टेशन येथे रेल्वे सुरक्षा बल यांचे ठाणे असून तेथे १ निरीक्षक दर्जाचा अधिकारी, २ उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी व जवळपास ४० कर्मचारी नेमणूकीस आहेत. तसेच सध्या मुंब्रा ते दिवा या रेल्वे स्थानकांदरम्यान दंगल नियंत्रण पथकाची गाडी एक अधिकारी व १५ पोलीस कर्मचाऱ्यांसह दिवसा व रात्री ठेवण्यात येते.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

**मौजे डोंगरी (ता.रोहा, जि.रायगड) या गावात २१ कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार टाकल्याबाबत**

**(७८) * ५९९८ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरी (ता.रोहा. जि.रायगड) या गावात २१ कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार टाकल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौ.डोंगरी, पो.शेणवई, ता.रोहा येथील अर्जदार व इतर २२ कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकल्याबाबत दिनांक २२.०१.२०१५ रोजी रोहा पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज दाखल केला होता.

(२) होय.

(३) अर्जदार व इतर २२ कुटुंबांवर सामाजिक बहिष्कार टाकल्याचे चौकशीत आढळून आलेले नाही. सदरचा वाद हा गावातील दोन गटातील असून त्यांच्यात समझोता झाल्याने अर्जदाराने तक्रार मागे घेतली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अरबी समुद्रात शिवस्मारक उभारण्याबाबत

**(७९) * २८६२ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रात शिवस्मारक उभारण्याकरिता केंद्रिय पर्यावरण, वन, जलवायू, परिवर्तन मंत्रालयाने मंजूरी दिल्याचा अध्यादेश माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण रक्षण करण्याच्या राज्य सरकारच्या प्रस्तावास अधीन राहून ही मंजूरी देण्यात आली असून याकरिता काही असलेले निकष शिथिल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी हरकती व सूचना मागविण्याचे आदेशही केंद्र शासनाने राज्य शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यानुसार राज्य शासनाने हरकती व सूचना मागविल्या आहेत काय व आतापर्यंत किती हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत काय,

(५) असल्यास, या प्रकरणी सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने सीआरझेड-४ मध्ये स्मारकाचे बांधकाम करण्याकरीता अपवादात्मक प्रकरणात अनुमती देण्याच्या अनुषंगाने दिनांक १७.०२.२०१५ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे व त्यास अनुसरुन काही अटी व शर्तीच्या अधिन राहून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात उभारण्यास दिनांक २३.२.२०१५ च्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) हरकती व सूचना केंद्र शासनाने मागविल्या होत्या. त्यामुळे त्या राज्य शासनाकडे प्राप्त होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे सविस्तर आराखडे, डिआईन, अंदाजपत्रके इत्यादी नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(८०) * २९३१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात पोलिस आयुक्तालयाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात टोळीयुध्द अपहरण, खून, बलात्कार, दरोडे आदि गुन्ह्यांचे प्रमाण इतर जिल्ह्यांच्या तुलनेत बरेच वाढले असतांनाही जिल्ह्यात पोलिस आयुक्तालयाचा प्रस्ताव मंजूर करण्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार जिल्ह्यात पोलिस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अकोला शहरासाठी पोलीस आयुक्तालय निर्माण करणे, पोलीस अधिक्षक, अकोला यांच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील ११६२ पदे आयुक्तालयाकडे वर्ग करणे तसेच आयुक्तालयासाठी नव्याने ५५० पदांची निर्मिती करणे व आवर्ती/अनावर्ती खर्चास मंजूरी देणे असा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. अकोला आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाने तत्वत: मंजूरी दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्याबाबत**

**(८१) * ३१९५ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरानजिक आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विमानतळ निर्माण करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) पुणे जिल्ह्यातील विमानतळाच्या विकासासाठी सन २००९ पासून एकूण ६ स्थळे विचारात घेण्यात आली असून स्थळ क्र. १ व ४ बाबत भारतीय वायू दलाने तांत्रिक बाबी उपस्थित केल्यामुळे या दोन स्थळांचा विचार होवू शकला नाही. स्थळ क्र.३ बाबत भूसंपादन स्थानिकांचा प्रखर विरोध असल्यामुळे त्याबाबत पुढील कार्यवाही करता आलेली नाही. स्थळ क्र. २ मध्ये देखील मोठया प्रमाणात बागावत जमीनी व स्थानिकांचा विरोध आहे. तसेच डोंगर व घळी असल्याने सपाटीकरणाचा अतिरिक्त खर्च असल्यामुळे तसेच मोठया प्रमाणात वनजमीन असल्याने या स्थळाचा विचार करता आलेला नाही. स्थळ क्र. ५ मध्ये भामा नदीच्या पात्रात बदल करणे अभिप्रेत असून तसेच वन जमिनींचा मोठया प्रमाणात समावेश असल्याने या स्थळाच्या अनुषंगाने कार्यवाही करता आलेली नाही. स्थळ क्र. ६ बाबत अडचण म्हणजे आवश्यक १२६८ हेक्टर जमीनीपैकी ८१३ हेक्टर जमीन KEIPL कंपनीच्या ताब्यात असून या जमीन संपादनाच्या अनुषंगाने KEIPL कंपनीने MIDC ला सुमारे रु.३२१ कोटी अदा केले आहेत. या व्यतिरिक्त सुमारे ४५५ हे खाजगी जमीन संपादन करावी लागणार आहे. ८१३ हेक्टर जमिनीच्या संपादनास KEIPL कंपनीने विरोध दर्शवला आहे. सबब, पुणे जिल्ह्यात विमानतळ विकसित करण्याच्या अनुषंगाने जागेची निश्चित अद्याप होवू शकलेली नाही.

तथापि, जागा निश्चितीबाबत आवश्यक कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे.

-----------------

**मुंबईच्या पश्चिम किना-यावरील ट्रॉन्स हार्बर लिंक रस्त्याबाबत**

**(८२) * ३८०२ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, अॅड.अनिल परब, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, अॅड.जयदेव गायकवाड, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरातील वाहतूक कोंडीवर पर्याय म्हणून नरिमन पॉईंट ते मालाड मार्वेरोड पर्यंतच्या सुमारे ३६ किलोमीटर लांबीच्या कोस्टल रोडच्या प्रकल्पाची मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत सादरीकरण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नरिमन पॉईट ते मालाड-कांदिवली या दहा हजार कोटी रुपये खर्चुन बांधण्यात येणाऱ्या ३६ किमी लांबीच्या सागरी रस्त्याचा तसेच ट्रान्स हार्बर लिंग प्रकल्पाबाबत केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून मुंजरी देण्यात आली काय,

(३) असल्यास, या १० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पासाठी शासनाने सल्लागारांची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाची थोडक्यात रुपरेषा काय आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय, अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मुंबईतील सागरी किनारी रस्त्याच्या प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून मंजुरी प्राप्त झालेली नाही. ट्रान्स हार्बर लिंक (मुंबई-पारबंदर) प्रकल्पास केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने जुलै २०१३ मध्ये कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता दिली आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सागरी किनारा रस्ते डी.पी.आर.साठी सल्लागारांची नेमणूक केली आहे.

(४) सदर प्रकल्पात रस्ते, फ्लाईओव्हर, पुल इत्यादी समाविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यामधील लाचलूचपत प्रतिबंधक विभागाअंतर्गत महसुल विभागातील लाचखोर अधिकारी व तलाठी याच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(८३) * ३२७८ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यांमध्ये विशेषत: पुणे जिल्ह्यात सन २०१४ मध्ये लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने सुमारे १४८९ लाचखोरांना पकडले असून यामध्ये सर्वाधिक महसूल विभागाचे ३७९ अधिकारी असून त्यात १३४ तलाठी आहेत असे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू तलाठी हे नागरीकांकडून सात-बारा उताऱ्यांवर नोंदी करण्यापासून ते वेगवेगळे दाखले देण्याकरीता लाच घेत असल्याचे उघड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली असल्यास दोषींवर कोणत्या स्वरूपाची कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, लाचखोरीवर आळा बसविण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सन २०१४ मध्ये राज्यात एकूण १२४५ सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी पुणे परिक्षेत्रामध्ये सन २०१४ मध्ये एकूण २१३ सापळा प्रकरणी एकूण २८९ लोकसेवक व खाजगी इसम यांचेवर कारवाई करण्यात आली आहे. या २१३ सापळा प्रकरणांपैकी ४७ प्रकरणे महसूल विभागातील लोकसेवकांविरुध्द असून त्यामधील २६ प्रकरणातील लोकसेवक तलाठी आहेत.

(२) होय.

(३) तलाठयांविरुध्दच्या २६ सापळा प्रकरणांपैकी २० प्रकरणी विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. २ प्रकरणात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचे स्तरावर प्रलंबित आहेत. तसेच २ प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करण्यात येत असून उर्वरित २ प्रकरणे तपासी अधिकारी यांचे स्तरावर प्रलंबित आहेत.

(४) शासकीय लोकसेवकांच्या भ्रष्टाचारासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावर मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिले असून त्यावर कोणत्याही लोकसेवकाविरुध्द ॲपद्वारे ऑनलाईन तक्रार पाठविता येते. त्यामध्ये फोटो, ऑडीओ व व्हीडीओ इत्यादी फाईल्स जोडून पाठविण्याची सोय आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना टोल फ्री क्रमांक १०६४ वर तक्रार नोंदविता येते. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर "तक्रार" या सदराखाली तसेच फेसबुक पेजवर देखील तक्रार करण्याची सेवा उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे २०० एकरहून अधिक जमिन तेथील खाजगी सावकारांनी बळकावली असल्याबाबत**

**(८४) * ५०४९ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, नेवासा, कर्जत व जामखेड तालुक्यातील सुमारे २०० एकरहून अधिक जमिन तेथील खाजगी सावकारांनी बळकावली असून त्या जमिनी परत मिळण्याबाबत व सावकारांविरुध्द कारवाई करावी या मागणीसाठी तेथील शेतक-यांनी मुंबईतील आझाद मैदानावर दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आंदोलन सुरु केले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील सर्वच शेतकरी अल्पभूधारक असून अनेक शेतक-यांनी त्याच्या कर्जाची परतफेड केली असतांना सुध्दा सावकाराने त्याच्या जमिनी परत दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्सास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित सावकाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील सुमारे १५ ते २० शेतक-यांनी दि.०८/०२/१५ ते दि.१३/०२/१५ या कालावधीत मुंबई येथील आझाद मैदानावर धरणे आंदोलन केलेले आहे.

(२) हे खरे नाही, सदर जमिनी सावकाराच्या ताब्यात नसून शेतक-यांच्या वहिवाटीत आहेत.

(३) व (४) होय,

प्रश्नात नमूद नेवासा, कर्जत व जामखेड तालुक्यातील शेतकरी आंदोलनास बसलेले नव्हते. या तालुक्यात सावकारांनी जमिनी बळकावल्याबाबत गुन्हे दाखल नाहीत. अनधिकृत सावकारी विरुद्ध पारनेर पोलीस स्टेशन येथे ५ गुन्हे नोंद आहेत त्यापैकी गु.र.नं.०८/०६, ११/०६ हे दोन गुन्हे मुंबई सावकारी अधिनियम १९४६ मधील कलम ३२(ब) (क), ३३(अ) (ब) (क), ३३(अ) (ब) (क), ३४ नुसार व गु.र.नं.१४/०६, १५/०६, १६/०६ हे तीन गुन्हे मुंबई सावकारी अधिनियम १९४६ मधील कलम ३२ (ब) (क), ३३ नुसार दाखल आहेत. सदर गुन्ह्यात एकूण १२ आरोपींना अटक केली आहे. सर्व आरोपींना जामीन मिळालेला असून सद्यःस्थितीत सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

-----------------

## मुंबई येथील गिरणी कामगारांना स्वस्त दरात घरे देण्याबाबत

**(८५) * ४०१२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील गिरणी कामगारांच्या घरासाठी, गिरणी मालकांनी मोफत जागा दिली, केंद्र शासनाने दोन लाख रूपये सबसिडी दिलेली आहे. राज्य शासनाने विविध कर माफ केलेले असतांना अवघ्या साडे सात लाखात घरे देणाऱ्या म्हाडाने सदर घराची किंमत २० लाख केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) अद्याप, चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मुंबईतील गिरणी कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी नगरविकास विभागाच्या शासन निर्णय दि. १२.१२.२००६ अन्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये गिरणी कामगारांच्या प्रतिनिधींचाही समावेश आहे.

संबंधित गिरण्यांनी यापूर्वी उपलब्ध केलेल्या जमिनीवर सन २०१२ पूर्वी सदनिका बांधून झाल्या होत्या. सदरहू सदनिकांकरीता जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांकरिता मुलभूत सुविधा" या उपयोजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या अनुदानातून गिरणी कामगारांच्या सदनिकांकरीता साधारणत: झालेले प्रति सदनिका रु.२.०६ लक्ष इतके अनुदान देण्यात आले होते. त्यामुळे सदनिकेची किंमत त्या प्रमाणात कमी होऊन सुमारे रु.१०.५० लक्ष इतकी झाली होती. तसेच म्हाडाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे आकारण्यात येणारा अनुषंगिक व अकल्पिक खर्च ८ टक्क्यांनी कमी करुन व देखरेख खर्च १५ टक्के एकूण किंमतीतून वगळण्यात आलेला आहे. त्यानुसार बहुमजली इमारतीमधील प्रती सदनिकेची सरासरी किंमत रु. ८.३४ लक्ष इतकी झाली होती.

त्यानंतर गिरणी कामगार संघटनांची मागणी लक्षात घेता सदरहू सदनिकांच्या किंमतीतून आणखी काही सूट देता येईल काय याबाबत तत्कालिन मा.मंत्री (संसदीय कार्य) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. त्यानंतर शासनाने दि. २०.०४.२०१२ रोजी विधानमंडळात घोषीत केल्यानुसार बहुमजली इमारतींमधील ६,७७८ सदनिकांची किंमत साधारणपणे १० टक्केने म्हणजेच सुमारे रु. ८४,०००/- ने कमी करुन ती रु. ७.५० लक्ष इतकी निश्चित करण्यात आली.

तसेच त्या व्यतिरिक्त ९ गिरण्यांचा म्हाडाकडे ताबा आलेल्या जमिनींपैकी ६ गिरण्यांच्या जमिनीवर प्रत्यक्ष बांधकाम अलिकडेच चालू करण्यात आले आहे. उर्वरीत ३ गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांकरीता ४१६० घरे बांधणे प्रस्तावित आहे. सदरहू घरे अद्याप बांधून व्हावयाची आहेत. त्यांचा खर्च/किंमत अद्याप निश्चित झालेली नाही. गिरणी कामगारांसाठी बांधण्यात येणारी सदरहू घरे पूर्णत्वास येतील, त्यावेळी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून घरांची किंमत निश्चित होणे योग्य राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयांचे हस्तांतरणाबाबत**

**(८६) * ३५४० अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेमार्फत गेल्या २२ वर्षापासून कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालय तसेच स्व.राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय चालविले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या सद्य:स्थितीतील कमकुवत आर्थिक स्थितीमुळे कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालय चालविणे जिकिरीचे ठरल्याने हे रुग्णालय भिवंडी म.न.पा.च्या भिवंडी येथील स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयाच्या धर्तीवर राज्य शासनाकडे हस्तांतरीत करण्यात यावे, असा निर्णय ठाणे महानगरपालिका प्रशासनाने माहे मे, २०१४ मध्ये घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेने तसा प्रस्ताव तत्कालिन प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांचेकडे दिनांक १७ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून त्याप्रकरणी अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय हस्तांतरणाच्या सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) तसेच निर्णय घेतला असल्यास, त्याचे स्वरुप काय व निर्णय घेतला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तसेच राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय चालविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात देणेबाबतचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या महासभेच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ नगरपालिके अंतर्गत मंजूर एकात्मिक झोपडपट्टी गृहविकास योजना व समाजकल्याण विभागाची घरकुल योजना प्रलंबित असल्याबाबत

**(८७) * ५६०२ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपालिके अंतर्गत एकात्मिक झोपडपट्टी गृहविकास योजना व समाजकल्याण विभागामार्फत घरकुल मंजूर करण्यात आली आहेत, परंतू अद्यापपर्यंत पुढील कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब माहे, जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मंजूर घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही. यवतमाळ नगरपरिषदे अंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेतील मंजूर ९७२ घरकुलांपैकी २९४ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून २०७ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास योजनेतील एकूण मंजूर ५७ घरकुलांपैकी ४३ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ९ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व ५ घरकुलांचे बांधकाम सुरु होणे बाकी आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे महापालिकच्या विकास कामासंबंधीत अनेक प्रस्ताव**
**निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(८८) * ५१८३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे महानगरपालिकच्या अनेक विकास कामासंबंधीत अनेक प्रस्ताव निधी अभावी प्रलंबित असून या प्रकल्पांची प्रस्तावित किंमत आता ५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी दुस-या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पास त्वरीत निधी उपलब्ध करण्यासह सदरील प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नागपूर महानगरपालिका अंतर्गत येत असलेल्या उत्तर सिवरेज झोन च्या मलनिस्सारण प्रकल्पाच्या प्रस्तावास केंद्रशासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या ट्राझिशन फेज अंतर्गत केंद्रीय शहरी विकास मंत्रालय अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मान्यता दिलेली होती. तथापि सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही. त्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला असता प्रकल्पाच्या केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या परंतू मार्च २०१४ अखेर निधी वितरीत न झालेले प्रकल्प नामंजूर असल्याबाबत केंद्र शासनामार्फत दिनांक ११.१२.२०१४ रोजी कळविण्यात आलेले आहे. केंद्र शासनाकडून नव्याने अभियान घोषित झाल्यास नवीन मार्गदर्शक सूचनाच्या अधिन झाल्यास नवीन मार्गदर्शक सूचनाच्या अधिन राहून सदर प्रस्ताव राज्य शासन सादर करु शकेल अश्या सूचना केंद्राने दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषतः मुंबई पोलीस दलातील पोलिसांवरील**
**कामाचा अतिरिक्त ताण कमी करणेबाबत**

**(८९) * ३७०४ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांना विविध कार्यक्रम, सण, उत्सव इत्यादीच्या निमिताने सतत वेळीअवेळी बंदोबस्ताचे काम दिले जाते, यामुळे याचा त्यांच्या जीवनशैलीवर व कुटुंब स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होवून गत ८ आठ वर्षात २४७ पोलिसांनी आत्महत्या केल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई पोलीस दलातील १४७ पोलिसांचा विविध आजार, कामाचा अतिरिक्त ताणतणाव इत्यादी कारणामुळे कामावर असताना मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नाची दखल घेवून पोलिसांनी तणावग्रस्त जीवनशैलीत तंदुरुस्त राहवे व त्यांच्यावरील कामाचा ताण कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गेल्या ८ वर्षात २१ पोलीस कर्मचा-यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे,

(२) मुंबई पोलीस दलातील १४७ पोलीसांचे विविध आजाराने निधन झाल्याचे खरे आहे. परंतु कामाच्या तणावामुळे निधन झाल्याचे अभिलेखावर नोंदी उपलब्ध नाहीत.

(३) शासनाने पोलीसांनी तणावग्रस्त, तंदुरुस्त रहावे व त्यांच्यावरील कामाचा ताण कमी करण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

१. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येते.

२. पोलीस अधिकारी/कर्मचारी हे तणावमुक्त व निरोगी कार्यरत राहण्यासाठी आरोग्यविषयक जागरुकता शिबीरांचे देखील आयोजन करण्यात येते.

३. पोलीस रुग्णालय/दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

४. कामाच्या ठिकाणी व्यायामशाळेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. कामाचा ताण कमी व्हावा यादृष्टीने वेगवेगळ्या प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रम तसेच क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

५. पोलीस क्लब/जिमखाना, विश्रामगृह, वसतीगृहे, उपहारगृहे, वाचनालय, अभ्यासिका इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

६. पोलीस कल्याण निधीतून शासनाच्या धोरणानुसार सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल इंन डोअर स्टेडियममध्ये एआयबी नॉकआऊट कार्यक्रम आयोजित केल्याची घटना

**(९०) * ५२०६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल इंन डोअर स्टेडियममध्ये दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास एआयबी नॉकआऊट हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉमेडी शो, करमणूक कार्यक्रम असल्याचे भासवून यात अश्लिल आणि बिभत्स कार्यक्रम दाखविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॉमेडी शो दाखवण्याची परवानगी घेऊन या कार्यक्रमाचा करमणूक कर ही बुडविण्यात आला असल्याचे तसेच या कार्यक्रमातील अश्लिल आणि बिभत्स संवाद, हावभावाचे व्हिडीओ क्लिप्स युटयूब या संकेत स्थळामार्फत प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे समाजात या कार्यक्रमाबद्दल संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होऊन आयोजक, कंपनी, कलावंत यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन गुन्हे दाखल करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) या कार्यक्रमाचा करमणूक कर महसूल व वन विभाग शासन निर्णय दि. २७/०२/१९५८ अन्वये भारतीय शास्त्रीय संगीत नाटय आणि नृत्य इ. कार्यक्रमांना करमणूक शुल्क माफ केले असल्याने तसेच समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रिडा व पर्यटन विभाग यांचेकडील दि. २३/१०/१९७२ व दि. ३०/०७/१९७७ च्या शासन निर्णयान्वये करमणूक शुल्क व सरचार्ज माफी देण्यात आलेली आहे.
सदर कार्यक्रमाचे व्हिडीओ क्लिप्स युटयुब या संकेतस्थळावर सध्या उपलब्ध नाहीत.
(४) व (५) सदर प्रकरणी ताडदेव पोलीस ठाणे येथे एम.ई.सी.आर. क्र.३२/२०१५ भा.दं.वि. कलम २९४, ५०९, १२० (ब), ३४ सह पर्यावरण कायदा कलम १५ सह एमआरटीपी कायदा कलम ५२ सह माहित तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (अ), ३७ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३, ११०, १३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील गिरणी कामगारांना एम.एम.आर.डी.ए. ची घरे देण्याबाबत**

**(९१) * ३६१९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक २० फेब्रुवारी, २०१४ रोजी अध्यादेश काढून एम.एम.आर.डी.ए. ची ५० टक्के घरे मुंबईतील गिरणी कामगारांना देण्याचे मान्य केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती गिरणी कामगारांना घरांचे वाटप करण्यात आले आहे व किती कामगार घरे मिळण्यापासून वंचित आहेत,
(३) अद्याप घरांचे वाटप झाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रामध्ये भाडेतत्वावरील घरे योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या एकुण सदनिकांपैकी ५०% पर्यंत सदनिका गिरणी कामगारांना उपलब्ध होणेसाठी, परवडणारी घरे म्हणून मालकी तत्वावर वाटपासाठी राखून ठेवण्याच्या

अनुषंगाने शासनाने मंजूर प्रादेशिक योजनेच्या भाडे तत्वावरील घरे योजनेच्या विनियमामध्ये दिनांक २१.२.२०१४ च्या अधिसूचनेन्वये फेरबदल मंजरू केलेला आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशामध्ये भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत प्रकल्पामध्ये प्राप्त होणा-या सदनिका विचारात घेवून ४ प्रकल्पामध्ये १६० चौ.फुटाच्या २ सदनिकांचे एकत्रिकरण करुन ३२० चौ.फुटाच्या सदनिका तयार करणेस व अशा एकत्रित सदनिका गिरणी कामगारांना शासन स्वतंत्रपणे ठरवेल त्या किंमतीवर व अटी/शर्तीवर मालकी तत्वावर देणेसाठी राखून ठेवणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविलेले आहे.

(२) व (३) शासनाने आदेश दिलेल्या ४ प्रकल्पामधील बांधकाम हे विविध टप्प्यावर असून त्यामधून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास अद्यापि सदनिका प्राप्त झालेल्या नाहीत. प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदनिका उपलब्ध होणार असून त्यांचे वाटप संकल्पित आहे.

-----------------

**नागपूर महानगरपालिकेच्या पाईप लाईन टाकण्यासह इतर दुरुस्ती कामे केलेल्या पाईप लाईनला गळती लागल्याबाबत**

**(९२) * ५१०१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएस अंतर्गत नागपूर महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या २०० कोटीच्या निधीतून शहरात पाईप लाईन टाकण्यासह इतर दुरुस्ती कामे केलेल्या पाईप लाईनला गळती लागल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर पाईप लाईनची गळती काढणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत**

**(९३) * ४१७७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत अफजलपूरकर समितीने शासनाकडे अहवाल सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पुनर्विकास प्रकल्पास आठ वर्षांचा कालावधी उलटून गेला असला तरी अद्याप पुनर्विकासाची कामे सुरु झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुनर्विकास प्रकल्पाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व तद्नुसार यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणताही निर्णय झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) धारावी पुनर्विकास प्रकल्पाकरीता अफजलपूरकर समिती नेमण्यात आली नव्हती. तथापि, बृहन्मुंबईतील तत्कालीन ५० लाख झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम निश्चितीसाठी श्री.दिनेश अफजलपूरकर, तत्कालिन अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. सदर अभ्यासगटाने दि. २०.०७.१९९५ रोजी दिलेल्या अहवालामध्ये अन्य शिफारशींसह धारावी क्षेत्राला “कठीण क्षेत्र” म्हणून घोषित करण्याची आणि अन्य क्षेत्राच्या तुलनेत धारावी क्षेत्राकरीता विक्री घटकासाठी प्रोत्साहानात्मक जास्त चटई क्षेत्र देण्याची महत्वाची शिफारस केली होती.

(२), (३) व (४) बृहन्मुंबईसाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३ (१०) च्या परिशिष्ट ४ मध्ये धारावी “कठीण क्षेत्रात” समाविष्ट होण्यासारखे असल्याचा उल्लेख आहे. धारावी क्षेत्राचा सर्वंकष एकात्मिक प्रकल्प विकासाच्या दृटीने धारावी हे अधिसुचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

त्याखेरीज सदरहू क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणू घोषित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी ४ चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाची एकूण ५ सेक्टर मध्ये विभागाणी करण्यात आली असून सेक्टर ५ चा पुनर्विकास म्हाडातर्फे करण्याचा निर्णय होऊन म्हाडाने आतापर्यंत ३५८ सदनिका असलेल्या एका इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे. म्हाडाकडून दुसऱ्या पुनर्विकास इमारतीच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे.

सेक्टर १ ते ४ च्या पुनर्विकासासाठी प्रारुप निविदा दस्तऐवज तयार करण्यात आले असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरु होणे अपेक्षित आहे.

-----------------

**मुंबईतील पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही बसविण्याबाबत**

**(९४) * ३०१० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २७ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील तुरुंगात कैद्यांच्या मृत्यूची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सर्व पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही लावण्याची आवश्यकता असून पोलीस ठाण्यात अद्यापी सीसीटीव्ही लावण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्टेशनमध्ये लवकरात लवकर सीसीटीव्ही लावण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) फौजदारी रिट याचिका क्र. २११०/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमधील प्रत्येक कॉरीडॉर, खोली व लॉकअपमध्ये रोटेटींग कॅमेऱ्यासह सीसीटीव्ही लावावे असे आदेश दि. १३/८/२०१४ रोजी दिले आहेत. सदर निर्णयाची अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने, गृह विभागाने प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

-----------------

**गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यातील पुस्टोलाजवळ नक्षलवाद्यानी वाहनांना लावलेली आग**

**(९५) * ५१५२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ५० कि.मी. अंतरावरील धानोरा तालुक्यातील पुस्टोलाजवळ यडमपायली जंगलात नक्षलवाद्यानी १५ वाहनांना आग लावून १ कोटी ८० लाख रुपयाचे नुकसान केल्याची घटना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पण झाले, तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील कोरकुटी गावाजवळ नक्षलवाद्यांनी दिनांक २२.०१.२०१५ रोजी रु.१.५४ कोटी किमतीची एकूण १४ वाहने जाळली.

(२) सदर प्रकरणी उप पोलीस स्टेशन, पेंढरी येथे अप.क्र.००१/२०१५ कलम ४३५, १४३, १४७, १४८, १४९, १२०(ब) भा.दं.वि. ३/२५ भा.ह.का. अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे. जिल्ह्यातील बांधकाम विभाग आणि पोलीस दल यांच्यामध्ये समन्वय ठेवण्यात येत असून संवेदनशील भागातील रस्ते व पुलाच्या कामांना तसेच जिल्ह्यांतर्गत सुरू असलेल्या विकास कामांना सुरक्षा पुरविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) भागात वाहतूक कोंडीची असलेली समस्या**

**(९६) * ४२८२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) भागात वाहनांची रहदारी वाढलेली असतानाच ओबेरॉय मॉलमुळे देखील दिंडोशी येथील रहिवाशांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मॉलच्या मागील बाजूसही बेकायदा वाहन पार्किंग होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोरेगाव येथील मॉल समोरची वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत तसेच बेकायदा वाहन पार्किंग करणा-या वाहनचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्‌याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गोरेगाव पूर्व भागामध्ये तसेच, दिंडोशी भागात वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली असल्यामुळे सदर ठिकाणी सकाळी वाहतूकीची घनता जास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. दि. २६.१.२०१५ रोजी सुट्टी असल्यामुळे ओबेरॉय मॉल येथे येणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांच्या वाहने मॉलच्या समोर व पाठीमागील रस्त्यावर उभी केल्यामुळे वाहतूकीची कोंडी झाली होती. तथापि, अधिक मनुष्यबळ पाठवून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

(२) व (३) सदर ठिकाणी गोरेगाव वाहतूक विभागाकडून सकाळी व सायंकाळी वाहतूक नियमनाकरीता एका पोलीस अंमलदाराची नेमणूक करण्यात येते. तसेच, सुट्टीच्या दिवशी/गर्दीच्या दिवशी स्थानिक पोलीस ठाण्याकडून अतिरिक्त अधिकारी व अंमलदार तसेच एक स्टाईकिंग वाहन स्टाफसह नेमण्यात येते.

ओबेरॉय मॉलच्या लगत अग्निशमन केंद्रासमोर सिग्नल बसविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. ओबेरॉय मॉलच्या समोरील रस्त्यावर, लगतच्या रस्त्यावर तसेच मॉलच्या मागील बाजूस असलेल्या रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर गोरेगाव वाहतूक विभागाकडून सन २०१३ मध्ये १,५७५ सन २०१४ मध्ये १,३२९ व सन २०१५ मध्ये दि. १०.३.२०१५ पर्यंत २७९ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे सांबरी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे प्रवासी जेट्टी व जेट्टीसाठी रस्ता बांधणेबाबतची स्थानिक आमदार यांनी केलेली मागणी**

**(९७) * ४५२३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांबरी (ता.अलिबाग, जि.रायगड) येथून पांडापूर येथे होडीद्वारे प्रवास करणारे प्रवासी मोठया प्रमाणावर असल्याने येथे प्रवासी जेट्टी व जेट्टीसाठी जोड रस्ता बांधणेबाबत स्थानिक आमदार यांनी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात तरतूद करणेसाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी प्रवासी जेट्टी व जोडरस्ता बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदर बाब विचाराधीन आहे.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिकेचा गोखिवरे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बंद असल्याबाबत

**(९८) * ४६३६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेचा गोखिवरे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बंद असल्यामुळे दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक त्रस्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने पाहणी वा चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत दुर्गंधी नियंत्रणाकामी विविध उपाययोजना राबविल्या जात असल्याने सदर ठिकाणी दुर्गंधीमुळे नागरीक त्रस्त आहेत अशी वस्तुस्थिती नाही.

(२) (१) गोखिवरे येथील महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावर नियमीतपणे महानगरपालिका अधिकाऱ्यांमार्फत पाहणी व तपासणी केली जाते.

(२) महानगरपालिकेतर्फे घनकचऱ्यावर वेळोवेळी माती टाकुन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येते. दैनंदिन स्वरुपात सदर ठिकाणी घनकचऱ्यावर जंतुनाशके तसेच हार्बोस्प्रे अशा औशधांची फवारणी करण्यात येऊन दुर्गंधी नियंत्रित केली जाते.

(३) सल्लागार यांचे सल्ल्यानुसार कचऱ्यामधील मिथेन गॅस गोळा करणे व विल्हेवाट लावण्याची कार्यप्रणाली (Mechanism) बसविण्यात आली आहे.

(४) सदर ठिकाणी दैनंदिन जमा होणारा कचरा सपाटीकरण करण्यात येत आहे.

(५) याशिवाय खाजगी सल्लागारांच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल बनविला असून अहवालानुसार तातडीने हाती घ्यावयाची कामे तसेच कचरा क्षेपणभूमी क्षेत्राचा घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० नुसार विकास व कचऱ्यापासून उर्जा साधनाचा विकास याबाबत केलेल्या शिफारसींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.